दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । घाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक ३५३ । बुधवार ०७ ऑक्टोबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

# दुष्काळाचा दाह वाढला!

## राज्यात आणखी १९ तालुक्यात दुष्काळ जाहीर | रोजगार हमीची कामे वाढवा : फडणवीस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** राज्यात १० टक्के पाणी कपातीची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी तसेच दुष्काळी भागात रोजगार हमी योजनेतील कामे वाढवावीत असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत दिले. दुसरीकडे राज्यात दुष्काळाची व्याप्ती वाढू लागली असून आणखी १९ तालुक्यात दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्याचा निर्णय मंगळवारी दुष्काळ निवारण उपाययोजना मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे राज्यातील दुष्काळी तालुक्यांची संख्या आता ३०२ झाली आहे. दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यातील पंचनामे २० ऑक्टोबर पूर्वी पूर्ण करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले असून बाधित शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत करण्याचे नियोजन करण्याचेही समितीने प्रशासनास दिले.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. यावेळी राज्यातील २६५ तालुक्यातील ३२ हजार ८२३ गावांपैकी १७ हजार ९४१ गावातील ३८ लाख १७ हजार हेक्टर क्षेत्रावरील नुकसानीचे पंचनामे करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. त्याचप्रमाणे आणखी काही तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याची माहिती मंत्रिमंडळास देण्यात आली. त्यावेळी पाण्याचे नियोजन आतापासूनच करा, १० टक्के पाणी कपातीची राज्यभरात काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.

त्यानुसार शहरी व ग्रामीण भागात १० टक्के पाणीकपात लागू करण्यासोबतच, शेतकऱ्यांना कर्जवसुलीसाठी त्रास देणाऱ्या बँकांवर कारवाई करणे, चाऱ्याची टंचाई दूर करणे आणि दिवाळीपूर्वी मदत वाटपाचे नियोजन करण्याबाबत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय दुष्काळ निवारण उपाययोजना मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली संध्याकाळी झालेल्या बैठकीत घेण्यात आले.

जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन



मंत्री पंकजा मुंडे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील तसेच विविध विभागांचे सचिव आणि अधिकारी उपस्थित होते.

राज्यात सध्या ४५ टक्क्यांवर पंचनामे पूर्ण झाले आहेत. उर्वरित पंचनाम्यांचे काम जलद गतीने पूर्ण करुन कोणत्याही परिस्थितीत २० ऑक्टोबर पर्यंत पंचनामे पूर्ण करण्याचे आदेश बैठकीत देण्यात आले. तसेच पंचनाम्यासाठी ५ टक्के निधी वेगळा राखून ठेवण्याचे आदेशही जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

शेतकऱ्यांना कर्जवाटप करताना बँकांकडून होणाऱ्या विलंबाबाबत मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष बावनकुळे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. बँकांच्या अडमुठ्या धोरणावर टीका करताना राज्यात आतापर्यंत केवळ ८ टक्केच पीक कर्जवाटप झाल्याचे सांगताना, बँकांनी शेतकऱ्यांकडे वारंवार कागदपत्रांची मागणी करू नये, एकदा पीक कर्ज घेतले असल्यास पुन्हा कागदपत्रे मागू नयेत, असे आदेश दिले. तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा खाजगी बँकेने अथवा खाजगी फायनान्सरने या काळात शेतकऱ्यांना कर्जभरण्यासाठी फोन करून वेठीस धरू नये. असे प्रकार घडल्यास कडक कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला. याप्रकरणी मुख्य सचिवांच्या स्तरावर तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय बैठका घेऊन प्रश्न सोडवण्याचे आदेश देण्यात आले.

शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी कर्जमाफीतील वारसांच्या नोंदी आणि केवायसी गावनिहाय **(पान ४ वर)**

### केंद्रीय पथक दोन दिवसात राज्यात

राज्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय समिती दोन दिवसात राज्यात येणार आहे. येत्या १० किंवा १२ तारखेला केंद्रीय समिती पाहणीसाठी राज्यात येणार आहे. ही समिती तीन स्वतंत्र पथकांद्वारे बीड-धाराशिव, यवतमाळ-वाशिम आणि अहिल्यानगर-सोलापूर या जिल्ह्यांचा दौरा करून आढावा घेणार आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले.

### प्रत्येक जिल्ह्याला नवीन १ हजार ट्रान्सफार्मर मंजूर, अखंडित वीजपुरवठा

राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमध्ये बळीराजाला मोठा दिलासा देणारा अभूतपूर्व निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. वितरण रोहित्र, 'स्पेशल डिझाइन ट्रान्सफॉर्मर' आणि 'कॅपॅसिटर बँक' खरेदी करण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास समिती (डीपीडीसी) अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यासाठी तब्बल २० कोटी रुपयांपर्यंतचा विशेष निधी उपलब्ध करून देण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने मंगळवारी मंजुरी दिली. महावितरणकडून राज्यात सुमारे ४७ लाखांवर कृषी ग्राहकांना विविध क्षमतेच्या वितरण रोहित्रांद्वारे वीजपुरवठा केला जात आहे. दुष्काळी परिस्थितीत हा वीजपुरवठा सुरळीत आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम राहणे आवश्यक असल्याने राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात वीज यंत्रणा सक्षम करण्याचे आदेश दिले आहेत.

### दुष्काळ जाहीर झालेले १९ तालुके

| | |
|---|---|
| **नांदेड** | **: सुरतखेडा, मुखेड, अर्धापूर ३** |
| **चंद्रपूर** | **: चिमूर, ब्रह्मपुरी, बल्लारपूर ३** |
| **गोंदिया** | **: आमगाव, देवरी, सालेकसा, गोंदिया ४** |
| **वर्धा** | **: कारंजा १** |
| **भंडारा** | **: मोहाडी, तुमसर २** |
| **नाशिक** | **: त्र्यंबकेश्वर, चांदवड, निफाड ३** |
| **सातारा** | **: पाटण १** |
| **सांगली** | **: शिराळा, कडेगाव २** |



## बॅरिकेड्सवर चढत तिरंगा फडकावला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी लोकशाहीविरोधात गद्दारी केली आहे, त्यामुळे त्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी आक्रमक मागणी करत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिल्लीत थेट रस्त्यावर उतरून आंदोलन केले. दिल्लीमध्ये इंडिया आघाडीच्या 'सेव्ह डेमॉक्रसी मार्च' दरम्यान राहुल गांधी यांचा आक्रमक अवतार पाहायला मिळाला.

**ज्ञानेश कुमारांच्या विरोधात राहुल गांधी आक्रमक**

आंदोलनाला रोखण्यासाठी दिल्ली पोलिसांनी लावलेल्या बॅरिकेड्सवर स्वतः चढत राहुल गांधी यांनी हातात तिरंगा फडकावला. या आंदोलनामुळे दिल्लीतील राजकीय वातावरण प्रचंड तापले असून संपूर्ण देश ढवळून निघाला आहे.

राहुल गांधी यांनी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर जोरदार निशाणा साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, सरसंघचालक मोहन भागवत आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मिळून देशातील लोकशाही संपवली आहे. देशाच्या निवडणुका मोदी आणि शाह यांनी हायजॅक केल्या असून ज्ञानेश कुमार यांनी त्यांना थेट मदत केली आहे, असा आरोप राहुल गांधींनी केला. **(पान ४ वर)**

## धाडसाला मिळणार 'मुख्यमंत्री शौर्य पदका'ची सलामी

### साहसी पोलिसांना ५० हजार, पदक व प्रशस्तीपत्र

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** जीवाची पर्वा न करता कर्तव्य बजावताना संकटाशी दोन हात करणाऱ्या महाराष्ट्र पोलिसांच्या शौर्याला आता राज्य सरकारकडून स्वतंत्र सलामी मिळणार आहे. माओवाद, दहशतवाद, संघटित गुन्हेगारी, तस्करी अथवा दंगलीच्या प्रसंगी जोखीम पत्करून उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी राज्य सरकारने 'मुख्यमंत्री शौर्य पदक' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या सन्मानासोबत ५० हजार रुपयांचे रोख पारितोषिक आणि प्रशस्तीपत्रही दिले जाणार आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत या योजनेला मंजुरी देण्यात आली.

पोलीस दलातील अनेक अधिकारी आणि कर्मचारी कर्तव्य बजावताना स्वतःचा जीव धोक्यात घालून नागरिकांचे प्राण आणि मालमत्तेचे रक्षण करतात. अशा धाडसी कामगिरीची दखल घेऊन त्यांचा गौरव करण्यासाठी हे पदक देण्यात येणार आहे. **(पान ४ वर)**

## महत्वाचे..

### पोलीस कोठडीतील मृत्यू प्रकरणी नुकसानभरपाईच्या धोरणास मान्यता

**मुंबई :** पोलीस कोठडीतील व्यक्तींच्या मृत्यू प्रकरणात त्यांच्या जवळच्या वारसदारांना नुकसानभरपाई देण्याबाबतच्या धोरणास आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या धोरणानुसार पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या मारहाण, अत्याचार किंवा दबावामुळे मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाल्यास जवळच्या वारसदारास ५ लाख रुपये नुकसानभरपाई देण्यात येणार आहे.

अशा व्यक्तिस शारिरीक किंवा मानसिक छळामुळे पन्नास टक्क्यांहून कमी कायमस्वरुपी अपंगत्व आल्याचे निष्पन्न झाल्यास दोन लाख आणि त्याहून अधिक प्रमाणात अपंगत्व आल्याचे निष्पन्न झाल्यास चार लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. कोठडीतून पलायन करताना अपघात होऊन मृत्यू झाल्यास, अवाजवी मागणीसाठी उपोषण किंवा वैद्यकीय उपचार घेण्यास नकार दिल्याने झालेला मृत्यू या परिस्थितीत ही नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

## अवैध गर्भलिंग निदानाविरोधात यंत्रणा अधिक सक्रिय करणार : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** अवैध गर्भलिंग निदान आणि बेकायदेशीर गर्भपात रोखण्यासाठी आरोग्य, पोलीस आणि महसूल विभागांमध्ये समन्वय वाढवून जिल्हास्तरीय यंत्रणा अधिक सक्षम करण्यात येईल. विभागीय आढावा बैठका घेऊन कारवाईला गती देण्यासोबतच कार्यवाहीचा दर आठवड्याला आढावा घेतला जाईल, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.



### संघटित गुन्ह्यांत मोक्काची शिफारस

वारंवार आणि संघटित स्वरूपात अवैध गर्भलिंग निदान व बेकायदेशीर गर्भपात करणाऱ्या डॉक्टरांसह गुन्ह्यात सहभागी व्यक्तींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) लागू करण्याबाबत कृती दलाने शिफारस केली आहे. याबाबत विधी व न्याय विभागाचे मत घेऊन आवश्यक कायदेशीर पर्यायांचा अभ्यास करण्यास आरोग्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका दर्शविल्याचे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले.

मंत्रालयात राज्यस्तरीय कृती दलाच्या पहिल्या बैठकीत ते बोलत होते. कृती दलाच्या अध्यक्ष डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार डॉ. मनीषा कायंदे, उमा खापरे, स्नेहा दुबे तसेच संबंधित अधिकारी बैठकीस उपस्थित होते. नागपूर येथील हिवाळी **(पान ४ वर)**

## वडार समाजाला गौण खनिज उत्खननाची मर्यादा दोनशेवरून ५०० ब्रास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** पारंपरिक दगडफोडी आणि गौण खनिजाचे उत्खनन करून उपजिवीका करणाऱ्या वडार समाजाला मोठा दिलासा देणारा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयानुसार या समाजासाठी गौण खनिज स्वामित्वधनासाठी (रॉयल्टी) सवलत आता वार्षिक उत्खनन मर्यादा दोनशे ब्रास वरून, पाचशे ब्रास करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या सवलतीसाठी महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे), नियम १९६८ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीचे योग्य पध्दतीने सनियंत्रण करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजाचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ तयार **(पान ४ वर)**

## बी.आय.आर. कायदा पूर्ववत लागू करा; अन्यथा साखर कारखाने बंद

**साखर कामगारांचा कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा; थकीत वेतन तातडीने देण्याची मागणी**



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** साखर कामगारांच्या हक्कांवर परिणाम करणारा बी.आय.आर. (महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, १९४७) कायदा रद्द करण्याचा निर्णय तातडीने मागे घेऊन तो पूर्ववत लागू करावा, तसेच राज्यातील साखर कामगारांचे सुमारे एक ते दीड हजार कोटी रुपयांचे थकीत वेतन तातडीने अदा करावे, या प्रमुख मागण्यांसाठी राज्यातील साखर कामगारांनी सोमवारी (५ ऑक्टोबर) कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार इशारा मोर्चा काढला. २२ ऑक्टोबरपर्यंत मागण्या मान्य न झाल्यास राज्यातील साखर कारखाने बंद ठेवण्याचा इशारा साखर कामगार संघटनांच्या नेत्यांनी दिला.

महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्या काळे, सरचिटणीस राऊ शंकर पाटील, महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघाचे अध्यक्ष पी. के. मुंडे व सरचिटणीस आनंद वायकर यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला. राज्यभरातून सुमारे २५ ते ३० हजार साखर कामगार मोर्चात सहभागी झाले होते.

बिंदू चौकातून मोर्चाला सुरुवात झाली. दसरा चौक, व्हीनस कॉर्नर, असेंब्ली रोडमार्गे मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. हातात झेंडे, मागण्यांचे फलक घेतलेल्या कामगारांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे परिसर दणाणून गेला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झालेल्या सभेत कामगार नेत्यांनी आंदोलनाची पुढील दिशा स्पष्ट केली.

कारखाना कोणताही असो, प्रश्न एकच; संघटना कोणतीही असो, लढा एकच, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. साखर उद्योगातील कामगारांच्या विविध प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी नेत्यांनी केली. बी.आय.आर. कायदा रद्द करण्याचा निर्णय कामगारांच्या हिताविरोधात असल्याचा आरोप करीत तो तातडीने पूर्ववत लागू करण्याची मागणी करण्यात आली. तसेच विविध साखर साखर**(पान ४ वर)**

## वैजापूरमध्ये 'भाग्योदय ॲग्रो'वर FDA चा दणका

### २३.३२ लाखांचा खाद्यतेल साठा जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** "Safe Food Safe Maharashtra' मोहिमेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनाने वैजापूर तालुक्यातील गंगापूर रोडवरील घायगाव येथील मे. भाग्योदय ॲग्रो इंडस्ट्रीज या ऑईल रिपॅकिंग युनिटवर धडक कारवाई केली. तपासणीदरम्यान अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन, प्रचंड अस्वच्छता आणि अन्नपदार्थांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर त्रुटी आढळून आल्याने प्रशासनाने या युनिटचा परवाना तात्काळ निलंबित केला. संशयित निकृष्ट व चुकीच्या पद्धतीने लेबल केलेला (Substandard Misbranded) १०,७९८.४ किलो रिफाइंड पामोलिन ऑईलचा तब्बल २३ लाख ३२ हजार ४५५ रुपयांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी प्रज्ञा प्रमोद सुरसे यांच्या



पथकाने २ ऑक्टोबर २०२६ रोजी या संस्थेची अचानक तपासणी केली. अन्न सुरक्षा मानके व ऋडडअखच्या निकषांनुसार करण्यात आलेल्या तपासणीत संस्थेची कामगिरी अत्यंत समाधानकारक नसल्याचे समोर आले. एकूण ८६ गुणांपैकी केवळ ३६ गुण (४२ टक्के) मिळाल्याने संबंधित युनिट 'अपात्र' (Non-Compliance) ठरले.

**फरशी तेलकट, पाणीही संशयाच्या भोवऱ्यात**

तपासणीदरम्यान कारखान्यातील फरशी तेलकट व चिकट झालेली आढळली. अनेक ठिकाणी फरशी तुटलेली होती. उत्पादनासाठी वापरले जाणारे पाणी पिण्यायोग्य असल्याचे सिद्ध करणारे खड:१०५०० मानकानुसार प्रमाणपत्र अथवा चाचणी अहवाल उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले.

अन्नपदार्थ तसेच पॅकिंगसाठी लागणारे साहित्य उघड्यावर आणि थेट जमिनीवर ठेवण्यात आले होते. साठवणुकीसाठी आवश्यक जागाही अपुरी असल्याचे आढळले. याशिवाय तेल साठवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या लोखंडी टाक्यांऐवजी नियमानुसार स्टेनलेस स्टीलच्या टाक्यांचा वापर अपेक्षित असल्याचे तपासणीत स्पष्ट झाले.

**दरवाजे उघडे; कीटक प्रतिबंधक जाळ्यांचाही अभाव**

कारखान्याचे दरवाजे उघडे होते, तर खिडक्यांना कीटक प्रतिबंधक जाळ्या बसविलेल्या नव्हत्या. त्यामुळे धूळ, माशा व इतर कीटक अन्नपदार्थांच्या संपर्कात येण्याचा धोका निर्माण झाला होता. कीटक नियंत्रणासाठी (Pest Control) केवळ दाखला उपलब्ध असला, तरी प्रत्यक्षात प्रभावी कीटक नियंत्रण व्यवस्था आणि त्यासंबंधी आवश्यक अहवाल उपलब्ध नसल्याचेही पथकाच्या निदर्शनास आले.

कामगारांकडे फक्त टोपी; हातमोजे-ॲप्रनचा अभाव

अन्नपदार्थ हाताळणाऱ्या कामगारांच्या सुरक्षिततेबाबतही गंभीर त्रुटी **(पान ४ वर)**

**अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईनंतर भाग्योदय ॲग्रो इंडस्ट्रीजने एका पत्रकाद्वारे आपले स्पष्टीकरण दिले आहे. ही कारवाई आजची नसून सुमारे सात ते आठ दिवसांपूर्वीची असून, ती प्रामुख्याने 'भ्रामक लेबलिंग' आणि काही तांत्रिक बाबींशी संबंधित असल्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे. पामोलीन तेलाचा नमुना तपासणीसाठी पाठवला असून, त्याचा अहवाल अद्याप आलेला नाही. ग्राहकांनी कोणत्याही अफवा किंवा गैरसमजाला बळी पडू नये, असे आवाहन करत संस्थेने आमच्या उत्पादनांची गुणवत्ता आणि ग्राहकांचे समाधान हेच आमचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे म्हटले आहे. प्रयोगशाळेचा अंतिम अहवाल आल्यानंतर सर्व सत्यता पारदर्शकपणे समोर आणली जाईल, अशी ग्वाहीही संस्थेने दिली आहे.**

# धनुष्यबाणाचा फैसला की पक्षाच्या अस्तित्वाचा?

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

शिवसेना नाव आणि 'धनुष्यबाण' या निवडणूक चिन्हाभोवती सुरू असलेला कायदेशीर संघर्ष आता केवळ एका पक्षाच्या चिन्हाचा वाद राहिलेला नाही. हा वाद भारतीय लोकशाहीतील पक्षनिष्ठा, पक्षाची मालकी, विधिमंडळातील बहुमत, संघटनात्मक बहुमत आणि आमदारांच्या अपात्रतेचा परस्परसंबंध यांची कसोटी पाहणारा ठरला आहे. सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान न्यायमूर्तींनी उपस्थित केलेले प्रश्न या संपूर्ण प्रकरणाची गुंतागुंत अधोरेखित करणारे आहेत. विशेषतः, चिन्हाचा निर्णय शिंदे यांच्या विरोधात गेला तर पुढे काय? हा थेट प्रश्न राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरणे स्वाभाविक आहे.

शिवसेनेतील फुटीनंतर निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या गटाला 'शिवसेना' हे नाव आणि 'धनुष्यबाण' हे चिन्ह दिले. उद्धव ठाकरे गटाला स्वतंत्र नाव आणि चिन्ह स्वीकारावे लागले. मात्र, या निर्णयामागील प्रक्रिया, बहुमताचा निकष आणि पक्षाच्या मूळ संघटनेवर कोणाचा अधिकार, या प्रश्नांना न्यायालयीन कसोटी लागली आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय केवळ दोन गटांपैकी कोणाच्या राजकीय विजयाचा प्रश्न ठरणार नाही; भविष्यात एखाद्या राजकीय पक्षात मोठी फूट पडल्यास त्यावर कोणते घटनात्मक आणि कायदेशीर निकष लागू होतील, याचेही दिशादर्शन या निकालातून होणार आहे.

या सुनावणीत न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांनी उपस्थित केलेले प्रश्न विशेष महत्त्वाचे आहेत. पक्षातील काही सदस्य अपात्र ठरले, काही बाहेर पडले आणि उरलेल्या सदस्यांच्या आधारे पक्षाचे चिन्ह ठरवायचे झाल्यास मूळ पक्षावर अधिकार कुणाचा, हा प्रश्न सहज सुटणारा नाही. निवडणूक चिन्ह हे केवळ निवडणूक लढविण्याचे साधन नसते. त्यामागे पक्षाचा इतिहास, विचारधारा, संघटनात्मक ओळख आणि मतदारांच्या मनातील विश्वास जोडलेला असतो. त्यामुळे चिन्ह कोणाला मिळते, याला प्रचंड राजकीय महत्त्व प्राप्त होते.

याच ठिकाणी 'बहुमत' या शब्दाचा अर्थ निर्णायक ठरतो. विधिमंडळातील आमदारांचे बहुमत म्हणजे पक्षाचे बहुमत असे सरसकट मानता येईल का? की पक्षाची खरी ताकद संघटनात्मक रचनेत, पदाधिकाऱ्यांमध्ये आणि तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये शोधली पाहिजे? निवडणूक आयोगासमोर अशा संघटनात्मक बहुमताची तपासणी करणे कितपत व्यवहार्य आहे, हा प्रश्नही न्यायालयाने उपस्थित केला आहे. एखाद्या पक्षात लाखो सदस्य असतील, तर त्यांच्या संख्येच्या आधारे बहुमत ठरविणे प्रत्यक्षात किती शक्य आहे, हा ... निवडणूक आयोगाच्या अधिकारांच्या मर्यादांकडे निर्देश करणारा आहे.

शिवसेना प्रकरणाचे आणखी एक महत्त्वाचे अंग म्हणजे दहावी अनुसूची आणि पक्षचिन्हाचा वाद यांच्यातील संबंध. पक्षांतरबंदी कायदा आमदारांच्या वर्तनाचा प्रश्न हाताळतो; तर निवडणूक चिन्हाबाबतचा निर्णय निवडणूक आयोगाच्या अधिकारक्षेत्राशी संबंधित आहे. हे दोन्ही विषय परस्परांशी जोडलेले असले तरी ते एकच नाहीत. त्यामुळे चिन्ह एका गटाला मिळाले म्हणून त्या गटातील प्रत्येक आमदार आपोआप वैध ठरतो किंवा दुसऱ्या गटातील प्रत्येक आमदार अपात्र ठरतो, असा सरळ निष्कर्ष काढणे धोकादायक ठरेल.

शिंदे गटाचे ज्येष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी याच मुद्द्यावर ठाम भूमिका मांडली आहे. चिन्हाचा निर्णय विरोधात गेला तरी त्यातून लोकप्रतिनिधींची अपात्रता आपोआप ठरत नाही, हा त्यांचा युक्तिवाद आहे. उद्धव ठाकरे यांनी बहुमत चाचणीला सामोरे जाण्याआधी राजीनामा दिला, त्यानंतर राज्यपालांनी एकनाथ शिंदे यांना सरकार स्थापनेसाठी आमंत्रित केले, या घटनाक्रमाचाही त्यांच्या युक्तिवादात आधार आहे. दुसरीकडे, या घटनाक्रमाला पक्षफुटीच्या व्यापक घटनात्मक संदर्भात कसे पाहायचे, हा मूळ प्रश्न न्यायालयासमोर आहे.

यामुळेच 'कोण मुख्यमंत्री झाले?' किंवा 'कोणाकडे किती आमदार होते?' एवढ्यावर या प्रकरणाचे मूल्यमापन करता येणार नाही. राजकीय सत्ता आणि पक्षाची संघटनात्मक ओळख या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. विधिमंडळात बहुमत असणे सरकार स्थापन करण्यासाठी निर्णायक ठरू शकते; मात्र त्यामुळे पक्षाच्या मूळ संघटनेवरही आपोआप अधिकार मिळतो का, हा स्वतंत्र प्रश्न आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या प्रश्नांमधून हीच सूक्ष्म रेषा अधिक स्पष्ट होताना दिसते.

न्यायालयाने 'सादिक अली'सारख्या जुन्या निर्णयांचा संदर्भ घेत उपस्थित केलेले प्रश्नही महत्त्वाचे आहेत. पूर्वीच्या प्रकरणांमध्ये पक्षातील वाद सोडवताना वापरलेले निकष आजच्या बदललेल्या राजकीय परिस्थितीत तंतोतंत लागू करता येतील का, याचा विचार करावा लागणार आहे. तसेच 'राणा' प्रकरण आणि 'सुभाष देसाई' प्रकरणाचा संदर्भ देताना कोणता सिद्धांत कोणत्या परिस्थितीत लागू होतो, हेही तपासणे आवश्यक आहे. कायद्याच्या प्रत्येक निर्णयाचा संदर्भ, त्यातील तथ्ये आणि त्याचा घटनात्मक आधार लक्षात न घेता राजकीय सोयीने अर्थ लावणे योग्य ठरणार नाही.

या सुनावणीतील सर्वात गंभीर प्रश्न मात्र 'घटनात्मक पाप' या संकल्पनेभोवती फिरतो. पक्षफुटीला राजकीय बंड म्हणायचे की घटनात्मक प्रक्रियेतील वैध मतभेद मानायचे? लोकप्रतिनिधी आपल्या पक्षाच्या नेतृत्वाविरोधात उभे राहिल्यानंतर त्यांची निष्ठा पक्षाशी राहते की केवळ मतदारसंघाशी? आणि पक्षातील नेतृत्व बदलण्यासाठी विधिमंडळातील बहुमत पुरेसे आहे की संघटनात्मक प्रक्रियाही आवश्यक आहे? या प्रश्नांची उत्तरे केवळ शिवसेनेपुरती मर्यादित राहणार नाहीत.

म्हणूनच या प्रकरणात कोण जिंकले आणि कोण हरले, यापेक्षा न्यायालय कोणता घटनात्मक सिद्धांत प्रस्थापित करते, हे अधिक महत्त्वाचे आहे. शिंदे गटाला अनुकूल निकाल मिळाला तर विधिमंडळातील बहुमताला पक्षाच्या ओळखीच्या प्रश्नात मोठे महत्त्व मिळू शकते. उलट, ठाकरे गटाला अनुकूल निकाल मिळाला तर पक्षाची संघटनात्मक सातत्यता, मूळ पक्षाची ओळख आणि पक्षांतर्गत लोकशाही यांना अधिक वजन मिळण्याची शक्यता आहे.

लोकशाहीत पक्ष हे व्यक्तींच्या मालकीचे नसतात; ते कार्यकर्ते, विचारधारा, संघटना आणि मतदारांच्या विश्वासावर उभे असतात. म्हणूनच 'धनुष्यबाण' कोणाकडे राहणार, हा प्रश्न महत्त्वाचा असला तरी त्यापेक्षा मोठा प्रश्न आहे, की, राजकीय पक्ष फुटल्यानंतर पक्षाची ओळख ठरविण्याचा अंतिम घटनात्मक निकष कोणता?

सर्वोच्च न्यायालयाचा निकाल या प्रश्नाचे उत्तर देईल. त्यामुळे ही सुनावणी शिवसेनेच्या दोन गटांची लढाई म्हणून पाहण्यापेक्षा भारतीय पक्षीय लोकशाहीच्या भवितव्याची कसोटी म्हणून पाहिली पाहिजे. धनुष्यबाणाचा फैसला काहीही असो; पण या प्रकरणातून लोकशाहीतील पक्षनिष्ठा, संघटनात्मक बहुमत आणि घटनात्मक नैतिकता यांची व्याख्या अधिक स्पष्ट झाली पाहिजे. कारण आजचा हा प्रश्न शिवसेनेचा आहे; उद्याचा प्रश्न कोणत्याही पक्षाचा असू शकतो.

## नवोदित मतदार नोंदणीला प्राधान्य द्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** लोकशाही व्यवस्थेत युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, १ ऑक्टोबर २०२६ रोजी १८ वर्षे पूर्ण केलेल्या प्रत्येक पात्र युवक-युवतीने मतदार म्हणून नोंदणी करून घ्यावी. नवोदित मतदारांची नोंदणी प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी विशेष पुढाकार घ्यावा, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे यांनी केले.

राहुरी येथील लोकनेते रामदास धुमाळ पाटील महाविद्यालयात ग्रामीण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित मतदार नोंदणी मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीची पात्रता, आवश्यक कागदपत्रे, अर्ज भरण्याची प्रक्रिया, मतदार यादीतील नावाची पडताळणी तसेच नोंदणी करताना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

काही वर्षांपूर्वी आपणही याच महाविद्यालयाचे विद्यार्थी होतो. आज अधिकारी म्हणून याच महाविद्यालयात विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची संधी मिळणे हा विशेष अनुभव आहे, असे सांगत गाढे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मतदार नोंदणी ही लोकशाहीतील सहभागाची पहिली पायरी असून, नवीन मतदारांनी स्वतःहून पुढे येऊन नाव नोंदवावे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी पात्र विद्यार्थ्यांचे प्रातिनिधिक स्वरूपात नमुना क्रमांक ६ भरून घेत नवोदित मतदार नोंदणीचा प्रारंभ करण्यात आला. प्राचार्य डॉ. नवनाथ दळवी यांनीही विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीचे महत्त्व सांगितले. तहसीलदार डॉ. अमित पवार यांनी महाविद्यालय प्रशासन, प्राध्यापक, विद्यार्थी प्रतिनिधी आणि निवडणूक यंत्रणेने समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. यावेळी नायब तहसीलदार विशाल सदनापूर, अनिल बडे, प्रा. अनिरुद्ध जाधव, अनिल टेमक, अभिजित रायकवाड यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

## राहुरी नगर परिषदेच्या उपाध्यक्ष पदासाठी हर्ष तनपुरे निश्चित

राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरी नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदाच्या गजानन सातभाई यांनी अवघ्या सहा महिन्यात ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदासाठी अखेर गटनेते हर्ष अरुण तनपुरे यांच्या नावावर जवळजवळ शिक्कामोर्तब झाला आहे. काल मंगळवारी दिनांक ६ ऑक्टोबर रोजी उपनगराध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पार पडली. यावेळी उपनगराध्यक्ष पदासाठी हर्ष अरुण तनपुरे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्या मुळे हर्ष अरुण तनपुरे यांचे नाव निश्चित करण्यात आले आहे.



उपनगराध्यक्षपदासाठी हर्ष तनपुरे यांच्या अर्जाला प्रशांत विजय डौले, प्रदीप नानासाहेब भुजाडी यांनी सूचक म्हणून, तर मावळते उपनगराध्यक्ष गजानन भागवत सातभाई यांनी अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली. त्यामुळे नगरपरिषदेत तनपुरे गटाची पकड कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे.

अर्ज दाखल करतेवेळी नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, नगरसेवक सागर तनपुरे,नंदू तनपुरे, बबन गुलदगड, प्रतीक तनपुरे,सोन्याबापू जगधने, राहुल शेटे, केतन पोपळघट, संगीता जाधव, लता जगधने, सूर्यकांत भुजाडी, संतोष उदावंत, अविनाश म्हस्के, आसमा शेख, प्रियंका आहेर, तसेच विरोधी गटनेते राजेंद्र उंडे व स्वीकृत नयन शिंगी यांच्यासह अनिल कासार, उपस्थित होते.

उपनगराध्यक्ष पदासाठी केवळ हर्ष तनपुरे यांचा एकच अर्ज दाखल झाल्याने त्यांची निवड निश्चित झाली असून केवळ औपचारिक निवड प्रक्रिया पार पडणे बाकी आहे. शुक्रवार दिनांक ९ ऑक्टोबर रोजी निवडणूक निर्णय अधिकारी ही निवड जाहीर करणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी किरण सावंत आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी विद्या पाटील यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली. गजानन यांच्या सातभाई राजीनाम्यानंतर उपनगराध्यक्ष पदासाठी कोणाचे नाव निश्चित होणार ही उत्सुकता आता संपली असून हर्ष तनपुरे यांच्या नावामुळे राहुरी नगर परिषदेत तनपुरे गटाची पकड कायम असल्याचे दिसून येत आहे.

## नजीक चिंचोलीत नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील नजीक चिंचोली येथील जगदंबा श्री खडेश्वरी देवी मंदिरात ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान नवरात्रोत्सव, अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवाची जय्यत तयारी सुरू असून, भाविकांसाठी विविध धार्मिक कार्यक्रम होणार असल्याची माहिती महंत गणेशानंद महाराज यांनी दिली.



उत्सव काळात दररोज पहाटे काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, महाआरती, कीर्तन व जागर असे कार्यक्रम होतील. ११ ते १९ ऑक्टोबरदरम्यान विविध महाराजांची कीर्तने आयोजित करण्यात आली आहेत. १७ ऑक्टोबर रोजी सातव्या माळेला जगदंबा खडेश्वरी देवीचा यात्रा महोत्सव होणार असून, भजन, दांडिया नृत्य आणि सायंकाळी छबिना मिरवणूक होईल.

२० ऑक्टोबर रोजी हभप गणेशानंद महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी उत्सवातील धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महंत गणेशानंद महाराज यांनी केले.

## गोवर्धन माळी सरांच्या ३५ वर्षांच्या ज्ञानसेवेला कृतज्ञतापूर्वक सलाम , सेवानिवृत्तीनिमित्त वळण येथे सेवापूर्ती सन्मान सोहळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील श्री संत गाडगे महाराज आश्रम शाळा, वळण येथील प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक गोवर्धन जनार्दन माळी यांनी ३५ वर्षांची प्रदीर्घ शैक्षणिक सेवा पूर्ण करून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती स्वीकारल्याबद्दल त्यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. आश्रम शाळेच्या बहुउद्देशीय सभागृहात झालेल्या कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष मधुसूदन मोहिते-पाटील, सचिव विष्णूभाऊ नाचवणे, सचिव डॉ. सचिन भाऊ घोंगटे, खजिनदार ज्ञानदेव महाकाळ, राहुरी नगर परिषदेचे नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, प्रकल्पाधिकारी देवकन्या बोकडे, माजी उपनगराध्यक्ष दशरथ पोपळघट, भिकूशेठ भुजाडी आदी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी श्री संत गाडगे महाराज मिशनचे खजिनदार तथा आश्रम शाळेचे संचालक अशोक पाटील होते.

प्रारंभी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संस्थेचे माजी उपाध्यक्ष, आदिवासी सेवक व दलित मित्र स्व. खांडवे अण्णा यांच्या सातव्या पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या प्रतिमेसही अभिवादन करण्यात आले. यानंतर मान्यवरांनी माळी सरांच्या ३५ वर्षांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी शिक्षण क्षेत्राशी नाते कायम ठेवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

सत्काराला उत्तर देताना गोवर्धन माळी यांनी आपल्या कुटुंबातील शैक्षणिक परंपरेच्या आठवणी सांगितल्या. आजोबा मुख्याध्यापक, तर वडील व चुलते शिक्षक असल्याने घरातूनच शिक्षणाचे संस्कार मिळाले. सेवाकाळात संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. संस्थेत प्रवेश मिळवून देण्यासाठी स्व. प्रल्हादराव पाटील यांनी केलेल्या सहकार्याचेही त्यांनी विशेष स्मरण केले.

माळी यांचा शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सहकाऱ्यांनी प्रेमाचे प्रतीक म्हणून त्यांना खुर्ची भेट देऊन विशेष सन्मान केला. तसेच मधुसूदन मोहिते यांना 'सामाजिक कृतज्ञता पुरस्कार' मिळाल्याबद्दल आणि डॉ. सचिन घोंगटे यांना डॉक्टरेट मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, ग्रामस्थ, पत्रकार व माळी यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन मुख्याध्यापक मंगेश पगारे यांनी केले.



## शिक्षक गव्हाणे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** शैक्षणिक सामाजिक धार्मिक क्षेत्रात करीत असलेल्या उल्लखनीय कार्याबद्दल पिचडगाव येथील आदर्श शिक्षक टिल्लू दादा गव्हाणे यांना शिवस्वराज्य बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्य पुनतगाव व आजी-माजी सैनिक कल्याणकारी मंडळ करमाळा यांच्या विद्यमाने देण्यात येणारा यावर्षीचा सर्वोच्च राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार नुकताच श्रीक्षेत्र देवगड झालेल्या कार्यक्रमात बाबा आरगडे, संस्थेचे अध्यक्ष सुभेदार मेजर आकुर्जी शिंदे, संजय वाघमारे व मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला

या सोहळ्याला राज्यभरातून अनेक कवी शाहीर गझलकार साहित्यिक गायक वादक ह भ प महाराज व लोक कलावंत हजर होते. जीवन गौरव पुरस्काराबद्दल आदर्श शिक्षक टिल्लू गव्हाणे यांचे नेवासा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले,नगरसेवक प्रवीण आप्पा सरोदे, विराट प्रतिष्ठानचे अध्यक्ष सागर सरोदे, शिवसेना जिल्हाध्यक्ष रामदास गोल्हार,माजी जि प सदस्य दिलीपराव सरोदे,पोलीस पाटील सुभाष शेजुळ, माजी सरपंच चंद्रकांत टिळेकर,पोपटराव सरोदे आरपी आयचे संजय बनसोडे आदींनी अभिनंदन केले आहे.

## त्रिमूर्ती विद्यालयाचा २५ वर्षांचा इतिहास एकाच छताखाली

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलातील श्री दादासाहेब हरिभाऊ घाडगे पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा माजी विद्यार्थी मेळावा नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला.

१९९९ पासून ते २०२५ पर्यंत शिक्षण घेतलेल्या तब्बल ३४७ माजी विद्यार्थ्यांनी या मेळाव्यास उपस्थिती लावून आपल्या शाळेप्रती असलेले प्रेम व्यक्त केले. २५ वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर गुरु-शिष्यांची ही भेट अविस्मरणीय ठरली.यावेळी निवडक माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. वसतिगृहात राहून शिक्षण घेतल्यामुळे शिस्त, स्वावलंबन आणि वेळेचे नियोजन कसे शिकायला मिळाले, याचे फायदे त्यांनी सांगितले. वसतिगृहातील पहाटेचा अभ्यास, एकत्र जेवण, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मित्रांसोबतच्या गंमती-जमती यांच्या आठवणींना उजाळा देताना अनेकांचे डोळे पाणावले. या मेळाव्याच्या प्रमुख पाहुण्या म्हणून त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या उपाध्यक्षा ॲड.स्नेहलताई चव्हाण- पाटील उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाळेचा वारसा पुढे चालवण्याचे आवाहन केले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य सोपान काळे, निवासी प्राचार्य एकनाथ कापसे, उपप्राचार्य शांतीलाल मेहेत्रे, समन्वयक दत्तात्रय वांढेकर, विभाग प्रमुख जितेंद्र पाटील, नामदेव ताके, मिलिंद सोनवणे यांच्यासह १९९९ पासून आजपर्यंत विद्यालयात सेवा दिलेले सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन कन्या विभागाचे विभाग प्रमुख प्रा. अशोकराव गाडे यांनी केले, तर आभार अरविंद देशमुख यांनी मानले. शेवटी सर्व माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रगतीसाठी सदैव योगदान देण्याचा संकल्प केला.

## वक्तृत्व स्पर्धेत ईश्वरी भोगे द्वितीय, 'विकसित भारत २०४७' विषयावरील प्रभावी सादरीकरण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** सेवा संकल्प अभियानांतर्गत नेवासा येथील सौ. बदामबाई विद्यालयात झालेल्या तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत पानसवाडी येथील स्व. तुकारामजी गडाख संचलित श्री हनुमान ग्रामीण पानसवाडी आदर्श विद्यालयाची विद्यार्थिनी ईश्वरी दत्तात्रय भोगे हिने द्वितीय क्रमांक मिळविला. या यशामुळे तिची जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मुळा कारखाना केंद्रातून सहभागी झालेल्या ईश्वरीने 'विकसित भारत २०४७' या विषयावर हिंदी भाषेत प्रभावी वक्तृत्व सादर केले. शब्दफेक, सादरीकरण, हावभाव



आणि प्रभावी प्रस्तावनेच्या माध्यमातून तिने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. प्रत्येक केंद्रातून दोन विद्यार्थ्यांची स्पर्धेसाठी निवड करण्यात आली होती. ईश्वरीच्या यशासाठी आवटे यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. पी. पवार यांचे मार्गदर्शन तिला लाभले. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव रविराज तुकाराम पाटील गडाख व अध्यक्षा जयश्रीताई गडाख यांनी अभिनंदन केले. मुख्याध्यापक पवार तसेच शिक्षकवृंदानेही ईश्वरीचे कौतुक करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुळा उजवा कालवा बंद करा : अमृत गडाख

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** सध्या मुळा धरण भरले असून गेल्या ४५ दिवसापासून मुळा उजवा कालव्यातून रोटेशन चालू आहे त्या अनुषंगाने आगामी रब्बी हंगामात पाण्याची टंचाई पाहता आणि धरणातून पाणी मिळेलच याची शाश्वती नसल्याने रोटेशन तात्काळ बंद करून पुढील खरीप हंगामात रोटेशनचा दिलासा द्यावा अशी मागणी शेतकरी संघटनेचे नेते अमृतराव गडाख यांनी केली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळ परिस्थितीत हॉरपळत असून पिके अक्षरशः करपले आहे. या भागात पाऊस अत्यल्प झाला असून सर्व पिके पाण्यावाचून जळाली आहे, त्यामुळे आर्थिक गणितच बिघडले आहे, मुळा उजवा कालवा बंद करून वाचलेले पाणी आगामी रब्बी हंगामातील गहू, हरभरा, कडबा, कांदा, भाजीपाला व इतर पिके घेण्यासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी आग्रही मागणी गडाख यांनी केली. शेतकऱ्यांना सल्ला देताना गडाख म्हणाले, की शेतकऱ्यांनी कमी पाण्यातील पिके घ्यावीत पिकाची व क्षेत्राची निवड करावी पाण्याची उपलब्ध पाहून पाण्यानुसारच पिकांची निवड करावी, व ऊस पिकासाठी ठिबक सिंचन चा वापर करून आर्थिक स्रोत जपण्याचे आवाहन केले . सध्या चालू असलेले मुळा उजवा कालव्याची पाण्याची उधळपट्टी शासनाने करू नये अशी आग्रहाची मागणी गडाख यांनी निवेदनाद्रे केली आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## बेलापूर नाभिक संघटनेच्या नविन कार्यकारिणीची निवड

**बेलापूर** :बेलापूर नाभिक संघटनेची बैठक संपन्न होऊन त्यात नूतन कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली. बैठकीत ठरल्यानुसार सुनील सोनवणे (अध्यक्ष ),_सचिन कणसे(उपाध्यक्ष );रमेश कुटे (कार्याध्यक्ष ),योगेश बोरसे व विजयराव शेजुळ(खजिनदार ), केशव जाधव (सरचिटणीस ), निलेश हुडे(सचिव ) तर संकेत शेजुळ (प्रसिद्धी प्रमुख ) याप्रमाणे नूतन पदांधिकाऱ्यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. सदर बैठकीत आठवड्यातील दर शनिवारी दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.तसेच दाढी कटिंगइत्यादीचे दरवाढी संदर्भात विचारविनिमय करून पुढील बैठकीत घेण्याचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात आला.बैठकीत नूतन पदाधिकारी यांचे अभिनंदन करण्यात आले. बैठकीस बेलापूर नाभिक समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## कासारे देवस्थान नवरात्रोत्सव नेवासा तालुक्यातील यात्रा समितीची निवड

**नेवासा** : संगमनेर तालुक्यातील कासारे देवस्थान येथे आयोजित करण्यात येणाऱ्या नवरात्रोत्सव व कासारे यात्रेच्या नियोजनासाठी नेवासा तालुक्यातील कासार समाज बांधवांची यात्रा समितीवर निवडण्यात आली. कुकाणा येथील श्रीधर कुंभकर्ण यांची अध्यक्षपदी, तर नेवासा येथील योगेश रासने व सोनई येथील संतोष कुंभकर्ण यांची उपाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

नेवासा येथील श्री मोहिनीराज मंदिर भक्तनिवास येथे झालेल्या बैठकीत आगामी २०२६-२७ वर्षातील नवरात्रोत्सव व कासारे यात्रेच्या नियोजनासाठी यजमान नेवासा तालुक्यातील समाजबांधवांमधून नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

नवी कार्यकारिणी पुढीलप्रमाणे अध्यक्ष श्रीधर कुंभकर्ण (कुकाणा) उपाध्यक्ष योगेश रासने (नेवासा), संतोष कुंभकर्ण (सोनई),,खजिनदार : अनंत रासने (खामगाव) सचिव गणेश विश्वंभर (कुकाणा),सदस्य : मनोज हुलजुते (कुकाणा) सल्लागार- किरण कुंभकर्ण (नेवासा), अरुण रासने (नेवासा फाटा) नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित समाज बांधवांनी अभिनंदन करून कासारे नवरात्रोत्सव व यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी कासारे देवस्थानचे विश्वस्त, निमंत्रित सदस्य तसेच नेवासा तालुक्यातील कासार समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा सहकारी बँकेवर बिनविरोध निवडीबद्दल माजी मंत्री गडाख यांचा सन्मान

**सोनई** : माजी मंत्री शंकरराव गडाख यांची जिल्हा सहकारी बँकेवर निवडणूक होण्याअगोदरच संचालक पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल परिसरातील कांगोणी, हिंगोणी , धनगरवाडी, शनिशिंगणापूर, शिरेगाव, परिसरातील कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. त्या निवडीचे औचित्य साधून माजी मंत्री गडाख यांचा मुळा सहकारी बँकेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब निमसे संचालक रामभाऊ कराळे, संचालक पोपटराव रौदळ, विश्वनाथ बनकर, बँकेचे व्यवस्थापक कुलकर्णी, आव्हाड, दरंदले आदिसह अशांख्य कार्यकर्त्यांनी पुष्पगुछ देऊन सन्मानित करण्यात आले.



## भविष्यात सिंगल फेज ची पूर्ण दाबाने वीज : उपअभियंता चात्रे

### साहेबराव वाबळे यांच्या वर अभिनंदनाचा वर्षाव

**शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** - सिंगल फेज पूर्णवेळ विजेची ग्राहकांची मागणी ही त्यांच्याच हातात आहे. वीज वितरण कंपनी यासाठी सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही उप अभियंता बालाजी चात्रे यांनी दिल्याची माहिति प्रगतशील शेतकरी साहेबराव वाबळे यांनी दिली. बेलापूर बुद्रुक वार्ड क्रमांक एक मधील सातभाई वस्ती, बागबान सेक्टर, रासकर, मेहत्रे, वाबळे, म्हैस, गागूर्ड, भांड, भगत, शेख, खरमाळे, खोडाळ, कापसे बारहाते या वस्त्यांवर सिंगल फेज माध्यमातून अखंडपणे वीज मिळावी, या मागणी बाबत वाबळे यांनी आज उपअभियंता चात्रे यांच्याशी तासभर चर्चा केली. यावेळी चात्रे म्हणाले, केसापूर येथे वीज रोहित्र बसवण्याचे काम येत्या पंधरा दिवसात पूर्ण होणार आहे. यानंतर सातभाई बागवान वाबळे खरमाळे बाराहाते रासकर म्हैस, गागूर्ड, भांड,भगत, मेहेत्रे शेख या वस्त्यांना अखंडितपणे वीज मिळावी यासाठी येत्या आठ दिवसात प्रयत्न केले जातील. अखंडपणे वीज मिळविण्याचे ग्राहकांचे असलेले स्वप्न हे त्यांच्याच हातात आहे. वाड्या वस्त्यांवरील ग्राहकांनी सामंजस्याने सिंगल फेज मध्ये फक्त घरातील ट्यूब फॅन अशी सामग्रीच चालवावी. तसे झाल्यास कुणालाही अंधाराशी सामना करावा लागणार नाही. या पुढच्या काळात ग्राहकांचे समुपदेशन करण्यासाठी ग्राहक मेळावे घेतले जातील, अशी ग्वाही चात्रे यांनी दिल्याची माहिती वाबळे यांनी दिली. दरम्यान, सिंगल फेजची विज पूर्णवेळ आणि पूर्ण दाबाने मिळत नसल्याने ग्राहक वैतागले असताना वाबळे यांनी पुढाकार घेऊन वीज वितरण कंपनी अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून यावर तोडगा काढल्याबद्दल त्यांचे बेलापूर विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन राजेंद्र सातभाई, संचालक कलेश सातभाई, अकबर बागवान, जाकीर बागवान, अश्फाक बागवान, बाळासाहेब मेहेत्रे, रमेश पाटील वाबळे, संजय रासकर, अशोक भडके, रज्जाक बागवान, आसिफ बागवान, शाकीर बागबान, राजू बागवान, तसवर बागवान, शफीक बागवान, राहुल वाबळे, राहुल रासकर, भरत जाधव,शमशुद्दीन बागवान, इस्माईल बागवान, भैय्या बागवान, रईस बागवान, रेहान बागवान, सिद्दीक बागवान, शौकत बागवान शरफुद्दीन बागवान, हमीद बागवान, सलीम बागवान दानिश बागवान, कलीम बागवान आदींसह इतर वीज ग्राहकांनी धन्यवाद दिले आहेत

# विद्यार्थ्यांच्या सहभागातून 'इको-ब्रिक' उपक्रम

## प्लास्टिक संकलनातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहता** :नांदूर खुर्द-बुद्रुक, (ता. राहाता) जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या संकल्पनेतून ग्रामपंचायत नांदूर खुर्द-बुद्रुक व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहभागातून प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी 'इको-ब्रिक' उपक्रम सुरू करण्यात आला आहे.




प्रकल्प संचालक (जल जीवन मिशन) श्री. देसले आणि पंचायत समिती राहाताचे गटविकास अधिकारी विवेक गुंड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नांदूर बुद्रुक येथे विद्यार्थ्यांना इको-ब्रिक तयार करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले.

घरात जमा होणाऱ्या प्लास्टिक पिशव्या, खाद्यपदार्थांचे रॅपर्स व इतर स्वच्छ, कोरडा प्लास्टिक कचरा उघड्यावर न टाकता रिकाम्या प्लास्टिक बाटलीत घट्ट दाबून भरून इको-ब्रिक तयार करण्याची पद्धत विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. या उपक्रमांतर्गत विद्यार्थी घरातील प्लास्टिक कचरा संकलित करून शाळेत जमा करत आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये कचरा वर्गीकरण, पुनर्वापर आणि पर्यावरण संवर्धनाची सवय रुजविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. 'विद्यार्थी ते कुटुंब आणि कुटुंब ते समाज' या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश घराघरांत पोहोचविण्यात येत आहे. घरातील प्लास्टिक बाटलीत भरा, प्लास्टिक कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करा आणि पर्यावरणाचे रक्षण करा, असा संदेश यावेळी देण्यात आला.

या कार्यक्रमात सरपंच प्रितम विशाल गोरे पाटील, उपसरपंच अर्जुन गोरे पाटील, ग्रामपंचायत सदस्य उर्मिला गोरे, लता यादव, स्वाती सोडणार, सविता आभाळे, विजया माळी, रोहिणी बोधक, सुदर्शन पारखे, दिपक घोरपडे व भास्कर गोरे सहभागी झाले होते.

तसेच ग्रामपंचायत अधिकारी आर. आर. बोर्से, स्वच्छ भारत मिशनचे राहाता तालुका समन्वयक सागर आहेर, ग्रामपंचायत कर्मचारी, जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता माघाडे, शिक्षिक जया गिऱ्हे व चंद्रभागा धिंदळे यांच्यासह महिला व पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## संगमनेरच्या भावी पोलिसांसाठी 'मिशन खाकी'

### पोलीस भरती प्रशिक्षण केंद्रांमध्ये जनजागृती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : पोलीस दलात भरती होऊन देशसेवा करण्याचे स्वप्न उराशी बाळगून तयारी करणाऱ्या गरीब, गरजू व होतकरू युवक-युवतींना योग्य दिशा, मार्गदर्शन आणि आवश्यक सहाय्य मिळावे, या उद्देशाने 'मिशन खाकी पोलीस भरती योद्धा सहाय्यता अभियान' सुरू करण्यात आले आहे. या अभियानाच्या माध्यमातून संगमनेर शहर व तालुक्यातील विविध पोलीस भरती प्रशिक्षण केंद्रांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत २ ऑक्टोबर रोजी या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणी, योग्य मार्गदर्शनाचा अभाव, अर्ज भरण्याच्या प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी, कागदपत्रांची पूर्तता तसेच अभ्यासाचे नियोजन अशा विविध समस्यांना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर 'मिशन खाकी'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आवश्यक मदत व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. अभियानाची माहिती देण्यासाठी विनोद सूर्यवंशी, सौरभ देशमुख, अभिजीत पुंड, शशांक नामन, कृष्णा हासे, राहुल भोईर, सनी धारणकर, विशाल जोशी, मयूर म्हसे, कृष्णा गांडोळे व अनिकेत चांगले यांनी शहरातील विविध पोलीस भरती प्रशिक्षण केंद्रांना



भेटी दिल्या. यावेळी प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांना उपलब्ध होणाऱ्या सहाय्याची माहिती देण्यात आली. अडचणी किंवा समस्या असल्यास त्या 'मिशन खाकी'च्या माध्यमातून कळविण्याचे आवाहन करण्यात आले.

आर्थिक अडचणीमुळे शेतकरी व कष्टकरी कुटुंबातील कोणत्याही मुला-मुलीचे पोलीस होण्याचे स्वप्न अपूर्ण राहू नये, हा अभियानाचा उद्देश असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. अर्ज भरणे, कागदपत्रे किंवा अभ्यासाचे नियोजन याबाबत अडचण असल्यास आवश्यक मदत केली जाणार आहे.

दरम्यान, पोलीस भरतीच्या वेळापत्रकाबाबत वरिष्ठ पातळीवर बैठक होणार असून, लवकरच भरतीचे वेळापत्रक जाहीर होण्याची शक्यता आहे. रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने प्रक्रिया राबविली जाणार असल्याने इच्छुक युवक-युवतींनी तयारीला वेग द्यावा, असे आवाहन करण्यात आले.

## शेतकऱ्यांना सरसकट दुष्काळ निधी द्या

### रयत शेतकरी संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा**: नेवासा तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना कोणत्याही जाचक अटी न लावता सरसकट दुष्काळ निधी मंजूर करावा तसेच पाण्याअभावी जळून गेलेल्या ऊस पिकाचे तातडीने पंचनामे करून हेक्टरी भरीव मदत द्यावी, अशी मागणी ॲड. बापूसाहेब देशमुख यांच्या रयत शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली. याबाबतचे निवेदन तहसीलदार डॉ. संजय बिरादार व अपर तहसीलदार सोनाली मात्रे यांना देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, चालू वर्षी पावसाअभावी नेवासा तालुक्यात गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, रब्बीच्या पेरण्याही संकटात सापडल्या आहेत. शेतातील उभी पिके जळून गेल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. जनावरांच्या चारा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही दिवसेंदिवस गंभीर होत आहे. शेतमजुरांनाही काम मिळत नसल्याने त्यांच्या कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे. या परिस्थितीत सरसकट पंचनामे करून तातडीने दुष्काळ निधी मंजूर करावा, ऊस पिकाचे विशेष पंचनामे करून उत्पादकांना हेक्टरी भरीव मदत द्यावी, चालू वर्षाचे पीक कर्ज पूर्णपणे माफ करावे, जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात, तसेच पिके वाचविण्यासाठी आणि जनावरांच्या चाऱ्यासाठी पूर्ण क्षमतेने वीजपुरवठा करावा, अशी मागणी करण्यात आली. शेतकरी व शेतमजुरांच्या मुलांचे चालू वर्षाचे शैक्षणिक शुल्क माफ करण्याची मागणीही करण्यात



आली. मागण्यांचा गांभीर्याने विचार करून शासनाकडे सकारात्मक शिफारस करावी; अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला. यावेळी जिल्हाध्यक्ष बबनराव कोरडे, विशाल वरकड, बाळासाहेब येडूदादा कोरडे, अनिल पटारे, संजय वरखडे, गणेश सोनवणे, मारुती मुरदरे, अनिता पटारे व असिफ पठाण उपस्थित होते.

## रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदी: आ. काळेंची निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खा.शरदचंद्रजी पवार यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या बैठकीत कोपरगावचे आमदार आशुतोष काळे यांची मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाची जबाबदारी सांभाळतांना केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

रयत शिक्षण संस्थेशी काळे परिवाराचे अनेक दशकांपासूनचे अतूट नाते आहे. माजी खासदार कर्मवीर शंकररावजी काळे साहेबांनी कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून संस्थेला विविध प्रकारे सहकार्य करत रयतच्या शैक्षणिक विस्ताराला हातभार लावला. संस्थेच्या चेअरमनपदाची सलग पंधरा वर्षे जबाबदारी सांभाळताना रयतच्या विस्तारात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्याचा वारसा माजी आमदार अशोकराव काळे यांनी पुढे नेत संस्थेच्या शाळा-महाविद्यालयांच्या विविध प्रश्न,अडीअडचणी सातत्याने सोडविल्या. हि परंपरा पुढे घेवून जातांना आमदार आशुतोष काळे यांनीही संस्थेचे अध्यक्ष खा.शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली



रयतच्या उत्तर विभागाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर संस्थेच्या विकासासाठी उल्लेखनीय योगदान दिले. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मविभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षणविषयक विचारांना केंद्रस्थानी ठेवून काळे परिवाराने रयतला नेहमीच मातृसंस्था मानले आहे. उच्चशिक्षित असलेल्या आमदार आशुतोष काळे यांनी रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाची जबाबदारी समर्थपणे सांभाळताना शैक्षणिक गुणवत्ता आणि दर्जा उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वातून आणि वेळोवेळी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांतून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच नव्या संधी उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला. त्यामुळे उत्तर विभागाच्या शैक्षणिक वाटचालीला नवी दिशा मिळाली असून, गुणवत्ता आणि संधी यांचा समतोल साधणारा प्रभावी ठसा त्यांच्या कार्यातून उमटला. त्यांच्या या कार्याची खा.शरदचंद्रजी पवार यांनी विशेष दखल घेत त्यांची मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदी निवड केली आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि कार्यक्षमतेचा संस्थेच्या आगामी वाटचालीत निश्चितपणे उपयोग होणार आहे.

> कर्मवीर भाऊराव पाटील आणि कर्मवीर शंकररावजी काळे साहेबांनी जपलेल्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी पुन्हा माझ्यावर सोपविण्यात आली, हा माझ्यासाठी सन्मानासोबतच भावनिक क्षण आहे. आदरणीय खा.शरदचंद्रजी पवार साहेबांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास आणि रयत परिवाराने दिलेले प्रेम ही माझी मोठी ताकद आहे. काळे परिवाराच्या संस्कारांचा वारसा जपत रयत शिक्षण संस्थेच्या प्रगतीसाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी यापुढेही पूर्ण क्षमतेने सदैव कार्यरत राहणार.
>
> **-आ. आशुतोष काळे**

## निमगाव खेरीत विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील निमगाव खैरी येथील जि. प. प्रा. शाळा निमगाव येथे माजी विद्यार्थी मेळावा क्रमांक २ व माजी विद्यार्थी संघाची बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. शाळेने शताब्दी महोत्सवी वर्षात पदार्पण केले असून, माजी विद्यार्थी संघाच्या माध्यमातून शाळा विकासासाठी सुरू असलेले कार्य कौतुकास्पद आहे. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थ्यांनी यापुढेही भरीव योगदान द्यावे, असे आवाहन गटशिक्षणाधिकारी दिपक त्रिभुवन यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती प्रतिमापूजन व स्वागतगीताने झाली. प्रास्ताविकात मुख्याध्यापक संतोष वाघमोडे यांनी माजी विद्यार्थी मेळाव्याचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी सेवानिवृत्त कृषी अधिकारी मधुकर कदम यांनी माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या विकासासाठी योगदान देऊन शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करावी, असे आवाहन केले. सरपंच दत्तात्रय झुराळे व माजी विद्यार्थी संघाचे सदस्य शिवाजी शेजुळ यांनी मनोगतातून माजी विद्यार्थी संघाच्या उपक्रमाचे कौतुक केले. शाळेसाठी योगदान देणाऱ्या सर्व दात्यांचे यावेळी अभिनंदन करण्यात आले. यावेळी सरपंच दत्तात्रय झुराळे, उपसरपंच विजयसिंग परदेशी, मधुकर कदम, शिवाजी शेजुळ, चांगदेव कालंगडे, वेणुनाथ कालंगडे, गणेश भाकरे, बाळासाहेब दुशिंग, उत्तम भागडे, रेवणनाथ आगलावे, देवराम तुपे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणेश तरस, महेंद्र साबळे, पत्रकार लक्ष्मण साठे, भाऊसाहेब कालंगडे, उमाकांत तांबे, आप्पासाहेब तरस, सुरेश साबळे, आसाराम धुळगंड, इंद्रभान भागडे, मुरलीधर गोस्वामी, बन्सी चोखर, सूर्यभान झिंजुर्डे यांच्यासह बहुसंख्य माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक संतोष वाघमोडे, शिक्षिका प्रतिभा तोरणे, मीना निकम व सुधा गमे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पेमगिरी शहागडाच्या निसर्ग पर्यटन विकास आराखड्याला तत्वत: मान्यता

### आमदार अमोल खताळ पाटील यांच्या मागणीला यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याच्या संकल्पनेला प्रेरणा देणारे छत्रपती शहाजीराजे भोसले यांनी स्वराज्याचा संकल्प केलेल्या व ऐतिहासिक स्मृतींशी जोडलेल्या पेमगिरी(शाहगड) किल्ला परिसरा च्या पर्यटन विकासाला आता नवी दिशा मिळणार आहे. महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळामार्फत पेमगिरी येथील निसर्ग पर्यटन विकास आराखड्याला तत्वतः मान्यता मिळाल्याने संगमनेरच्या पर्यटन विकासाच्या दृष्टीने एक महत्वाचे पाऊल पुढे पडले आहे.

पेमगिरीचा शाहगड हा केवळ एक ऐतिहासिक किल्ला नाही, तर हिंदवी स्वराज्याच्या संकल्पनेशी जोडलेला प्रेरणादायी ऐतिहासिक वारसा आहे. याच पेमगिरीच्या भूमीतून छत्रपती शहाजीराजांनी हिंदवी स्वराज्याचा संकल्प केला, अशी ऐतिहासिक परंपरा आहे. त्यामुळे या परिसराचा विकास करताना इतिहास, निसर्ग, पर्यटन आणि स्थानिक रोजगार या सर्व बाबींचा समन्वय साधण्याची मोठी संधी निर्माण झाली आहे. पेमगिरी परिसराच्या पर्यटन विकासासाठी गेल्या अनेक वर्षांपासून विविध स्तरांवर प्रयत्न सुरू होते. मात्र हा विषय प्रत्यक्ष विकासाच्या टप्प्यावर नेण्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा आवश्यक होता.आमदार अमोल खताळ पाटील यांनी पेमगिरीच्या पर्यटन विकासाचा विषय शासनाच्या संबंधित विभागां कडे सातत्याने मांडत त्यासाठी पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना आता सकारात्मक प्रतिसाद मिळाला

या निर्णयासाठी महाराष्ट्राचे मुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे .सुनेत्रा पवार, पर्यटन मंत्री शंभूराज वन मंत्री गणेश नाईक तसेच पालकमंत्री मा.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नातून निसर्ग पर्यटन विकास आराखड्याला तत्वतः मान्यता मिळाली आहे. या निधीच्या माध्यमातून पेमगिरी परिसरामध्ये पर्यटकांना आवश्यक असणाऱ्या मूलभूत सुविधा निसर्ग पर्यटनाला पूरक विकास, ऐतिहासिक वारशाचे संवर्धन आणि स्थानिक पातळीवर पर्यटनाशी संबंधित रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाहीला गती मिळण्याची अपेक्षा आहे.


### जाहिर सुचनापत्र

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील तरतुदीनुसार (फक्त सभासदांकरीता)**

**वासुंदे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या वासुंदे ता पारनेर जि अहिल्यानगर**

या सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांना या सुचनापत्राव्दारे सुचित करण्यात येते कि, आपल्या संस्थेच्या संचालक मंडळातील सर्वसाधारण मतदार संघातील ०१ (एक) नैमित्तिक रिक्त जागेचे निवडीकरीता प्राधिकृत / अध्यासी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दि. १४/१०/२०२६ रोजी संस्थेचे सभासद / संचालकानी उपस्थित रहावे. सदर संस्थेच्या नैमित्तिक रिक्त जागा निवडीचा विस्तृत कार्यक्रम मा. सहायक निबंधक, सहकारी संस्था पारनेर व संस्थेचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

**(शुभांगी आर सराफ)**

प्राधिकृत अध्यासी अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-२


## दोन वर्षांचा 'रस्ता बंद'चा तिढा अखेर सुटला!

### महसूल-पोलिस प्रशासनाच्या संयुक्त कारवाईत शेतरस्ता खुला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा**: तालुक्यातील दिघी शिवारात गेल्या दोन वर्षांपासून बंद असलेल्या शेतरस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. भेंडे-सलाबतपूर रस्त्यापासून गट क्रमांक १५५/१/१ मधील रावसाहेब कडू यांच्या शेताकडे जाणारा शेतरस्ता महसूल व पोलिस प्रशासनाच्या प्रत्यक्ष उपस्थितीत खुला करण्यात आला. त्यामुळे या मार्गावरून शेतात ये-जा करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या दोन वर्षांपासून रस्ता बंद असल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना शेतात जाण्या-येण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत होता. याप्रश्नी प्रशासनाकडे करण्यात आलेल्या पाठपुराव्यानंतर तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाने



नियमानुसार कार्यवाही केली. रस्ता खुला करण्याच्या प्रत्यक्ष कार्यवाहीवेळी सर्कल अधिकारी श्रीमती मनाळ मॅडम, श्रीमती साळवे मॅडम, ग्राम महसूल अधिकारी तसेच हवालदार वाघमोडे दादा व त्यांचे सहकारी उपस्थित होते. पोलिस बंदोबस्तात महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून रस्ता खुला करण्याची कार्यवाही पूर्ण केली. पाच पंचांच्या उपस्थितीत पंचनामा; स्वाक्षऱ्यांसह कार्यवाहीची नोंद या कार्यवाहीतील महत्त्वाची बाब म्हणजे गावातील पाच पंचांच्या समक्ष सदर शेतरस्ता खुला करण्यात आला. प्रत्यक्ष कार्यवाहीची नोंद पंचनाम्यामध्ये करण्यात आली असून, उपस्थित पंचांनी पंचनाम्यावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. त्यामुळे रस्ता खुला करण्याच्या प्रत्यक्ष कार्यवाहीची अधिकृत नोंद संबंधित कागदपत्रांमध्ये राहणार आहे. यावेळी रस्त्यालगतचे संबंधित शेतकरीही मोठ्या संख्येने उपस्थित होते. महसूल अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, पोलिस कर्मचारी, पंच आणि संबंधित शेतकऱ्यांच्या उपस्थितीत ही कार्यवाही पार पडली. प्रशासनाच्या कार्यवाहीमुळे शेतकऱ्यांना दिलासा

दोन वर्षांपासून रस्ता बंद असल्याने शेतीची मशागत, शेतमालाची वाहतूक तसेच दैनंदिन शेतीकामांसाठी शेतकऱ्यांना अडचणी येत होत्या. अखेर प्रशासनाच्या हस्तक्षेपामुळे हा मार्ग खुला झाल्याने संबंधित शेतकऱ्यांना आपल्या शेतजमिनीपर्यंत ये-जा करण्यासाठी मार्ग उपलब्ध झाला आहे.

गट क्रमांक १५५/१/१ संदर्भातील या कार्यवाहीदरम्यान पंचनामा करण्यात आल्याने आणि पंचांच्या स्वाक्षऱ्यांसह कार्यवाही नोंदविण्यात आल्याने भविष्यात या मार्गाबाबत कोणताही वाद किंवा अडथळा निर्माण झाल्यास संबंधित महसूल अभिलेख व पंचनामा तपासण्यासाठी उपलब्ध राहणार आहे.

महसूल व पोलिस प्रशासनाच्या समन्वयातून झालेल्या या कार्यवाहीमुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेला शेतरस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला. दोन वर्षांपासून बंद असलेला मार्ग प्रशासनाच्या उपस्थितीत पुन्हा खुला झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

## जिद्द चिकाटीने यश निश्चितच मिळते : सुवर्णवीर इनामदार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील सुपुत्र तथा कबड्डी क्षेत्रात भारताचे नेतृत्व करून दोन वेळा सुवर्णपदक पटकाविणारे टिम लिडर असलम भाई इनामदार यांचा माऊली वृद्धाश्रमाच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात सन्मान करण्यात आला.

यावेळी आश्रमाचे अध्यक्ष सुभाष वाघुंडे यांच्या हस्ते असलम भाई इनामदार यांचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी पोलीस कॉन्स्टेबल वसीम इनामदार, पोलीस कॉन्स्टेबल गणेश इथापे, श्रीवेद देसाई, दिलीप गिरमे दत्तात्रेय खिलारी, शुभम नामेकर, दत्तात्रेय जेजुरकर तसेच गृह रक्षक दलाचे राजेन्द्र देसाई उपस्थित होते. राजेन्द्र देसाई यांनी असलम भाई यांच्या कर्तृत्वाला सलाम करणारी प्रेरणादायी कविता सादर करून शुभेच्छा दिल्या. यावेळी सुवर्णपदक विजेते असलम भाई इनामदार यांनी आश्रमातील मुलांशी संवाद साधताना सांगितले की, जीवनात ध्येय निश्चित करा. त्या ध्येयासाठी जिद्द, चिकाटी आणि सातत्याने सराव करणे आवश्यक आहे. प्रयत्न करणे हे आपल्या हातात आहे. आपण प्रामाणिकपणे आणि सातत्याने प्रयत्न करत राहिलो, तर यश शंभर टक्के आपल्या पदरात



पडते. त्यांच्या या प्रेरणादायी संदेशाने उपस्थित मुलांमध्ये नवी ऊर्जा आणि आत्मविश्वास निर्माण झाला. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मेहनतीच्या जोरावर देशाचे नेतृत्व करणाऱ्या असलम भाईंच्या यशाचा प्रवास विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे उपस्थितांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार मानण्यात आले. मेहनत, सराव आणि जिद्दीच्या जोरावर सामान्य परिस्थितीतूनही असामान्य यश मिळविता येते, असा प्रेरणादायी संदेश या सन्मान सोहळ्यातून देण्यात आला इनामदार परीवाराच्या वतीने मिष्ठान्न भोजनाचे आयोजन करण्यात आले होते

## पान १ वरुन

### वैजापूरमध्ये ‘भाग्योदय ॲग्रो’वर FDA चा दणका

आढळल्या. कर्मचाऱ्यांना केवळ डोयावर घालण्यासाठी कॅप देण्यात आली होती. मात्र हँडग्लोव्हज आणि ॲप्रन उपलब्ध नव्हते. विशेष म्हणजे अन्न सुरक्षा प्रशिक्षण घेतलेला एकही ऋेडढरउ प्रशिक्षित कर्मचारी युनिटमध्ये आढळला नाही.
नोंदवही व स्वतंत्र साठवण व्यवस्थाही नाही तपासणीदरम्यान तापमान नियंत्रणासंदर्भातील आवश्यक नोंदी ठेवण्यात आलेल्या नसल्याचे आढळले. तसेच रासायनिक पदार्थ आणि खराब अथवा वापरायोग्य नसलेला माल वेगळा ठेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था नसल्याचेही समोर आले. या सर्व बाबींमुळे अन्नपदार्थांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. २३.३२ लाखांचा तेलसाठा जप्त या कारवाईत रिफाइंड पामोलिन ऑईलचा १०,७९८.४ किलो साठा, अंदाजे २३ लाख ३२ हजार ४५५ रुपये किमतीचा, जप्त करण्यात आला. हा साठा संशयित निकृष्ट दर्जाचा तसेच चुकीच्या पद्धतीने लेबल केलेला असल्याच्या कारणावरून कारवाई करण्यात आली आहे.अन्न सुरक्षा विभागाने संबंधित संस्थेला आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नसून, अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांवर यापुढेही कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा सहआयुक्त श्रीकांत करकळे यांनी दिला आहे.

### बी.आय.आर. कायदा पूर्ववत लागू करा; अन्यथा साखर कारखाने बंद

कारखान्यांमध्ये प्रलंबित असलेले कामगारांचे वेतन तातडीने देण्याची मागणीही करण्यात आली. २२ ऑटोबरपर्यंत शासनाने मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर राज्यातील साखर कारखाने बंद ठेवण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. त्यामुळे आगामी काळात साखर कामगारांच्या आंदोलनाची तीव्रता वाढण्याची शयता आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातून प्रतिनिधी मंडळाचे कार्याध्यक्ष अविनाश आपटे, उपाध्यक्ष डी. एम. निमसे, मुळा कामगार संघटनेचे अध्यक्ष अशोक पवार, उपाध्यक्ष कारभारी लोडे, खजिनदार सुभाष सोनवणे, आदिनाथ शेटे, पारनेरचे शिवाजी औटी, वृद्धेश्वरचे शेषनारायण मस्के, एकनाथ जगताप, अशोक थिटे, देविदास म्हस्के, अशोकचे रवींद्र तांबे, अशोक पारखे, राहुरीचे इंद्रभाननाना पेरणे, कारभारी खुळे, कोळसे, सय्यद, कादवा कारखान्याचे भगवान जाधव, अजित दवंगे, अगस्ती कारखान्याचे शिवाजी कोठवळ तसेच श्रीगोंदा कारखान्याचे गवळी नंदू आदी सहभागी झाले होते.

### दुष्काळाचा दाह वाढला!

पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. कोणत्याही कारणाने शेतकरी लाभापासून वंचित राहता कामा नये आणि सर्व शेतकऱ्यांना विविध योजना लागू पडल्या पाहिजेत. ‘ॲग्रीस्टॅक’ नसलेल्या शेतकऱ्यांनाही मदत झाली पाहिजे आणि वर्ग २ मधील शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅकवर आणण्याचे काम करावे लागेल, असे सांगण्यात आले. तर कोकणातील शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅकची सक्ती केली करण्यात येऊ नये अशी सूचना नितेश राणे यांनी केली. बैठकीत चारा टंचाईवर मात करण्यासाठी चारा छावण्यांऐवजी थेट ग्रामपंचायतींमार्फत डेपो उभारून चारा वाटप करावा, ज्यामुळे जनावरे मालकाच्या घरी राहतील आणि शेतकरी दूध घरी ठेवू शकेल, असा प्रस्ताव बावनकुळे यांनी मांडला. यावर ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी भ्रष्टाचाराच्या कारणास्तव छावण्या पूर्ण नाकारता येणार नाहीत, कारण छावणीत सर्व सुविधा असतात; त्यामुळे चारा डेपो आणि छावणी या दोन्ही बाबी तपासून निर्णय घ्यावा, अशी सूचना केली. यावेळी वन विभागाच्या जमिनींवर, पडीक जमिनींवर तसेच जलसंपदाच्या तलावांलगतच्या शासकीय जमिनींवर ‘ग्रासलँड डेव्हलपमेंट’ करून मोठ्या चारा बँका तयार करण्याचा निर्णय झाला. खरीप हंगाम अडचणीत असला तरी एका पावसाच्या आधारे रब्बीचे पीक येऊ शकते, हे लक्षात घेऊन ज्या ठिकाणी ओलावा किंवा पाण्याचा पाठिंबा उपलब्ध असेल तिथे रब्बीत हरभरा (चना) आणि ज्वारी या पिकांना प्राधान्य दिले जाईल. बांधकामांसाठी शुद्ध किंवा पिण्याचे पाणी वापरण्यास सक्त मनाई करण्यात आली असून एसटीपी मधील प्रक्रिया केलेले पाणीच वापरण्याचे विकासकांना बंधनकारक करा आणि त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेशही बैठकीत देण्यात आले.

### अवैध गर्भलिंग निदानाविरोधात यंत्रणा अधिक सक्रिय करणार :आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

अधिवेशनापूर्वी पालघर, पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक येथे विभागीय आढावा बैठका घेण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. जिल्हानिहाय समित्या तसेच महानगरपालिका व जिल्हा परिषदांमधील प्राधिकृत आरोग्य अधिकाऱ्यांच्या कामकाजाचे परीक्षण केले जाणार आहे. अनोंदणीकृत सोनोग्राफी केंद्रांचा शोध, घराघरांत होणाऱ्या बेकायदेशीर तपासण्यांना आळा आणि पोर्टेबल सोनोग्राफी यंत्रांच्या ऑनलाइन विक्रीवर नियंत्रण आणण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. यंत्रांची खरेदी करणाऱ्यांची पात्रता तसेच खरेदी-विक्रीच्या नोंदी तपासण्यासाठी केंद्र शासन आणि संबंधित ऑनलाइन विक्री मंचांशी पत्रव्यवहार करण्याची सूचना करण्यात आली. मुलींचे जन्मप्रमाण कमी असलेल्या भागांत तक्रारीची वाट न पाहता सर्वेक्षण, चौकशी व तपासणी करण्याची सूचना डॉ. मनीषा कायंदे यांनी केली. जिल्हानिहाय सदस्यांना जबाबदारी दिल्यास कारवाई अधिक प्रभावी होईल, असे उमा खापरे यांनी सांगितले. आदिवासी भागांतही लिंगनिदानाचे प्रकार पोहोचल्याबद्दल स्नेहा दुबे यांनी चिंता व्यक्त केली. स्त्रीभ्रूणहत्या रोखणे ही केवळ महिलांची जबाबदारी नसून पुरुष लोकप्रतिनिधींचाही सक्रिय सहभाग आवश्यक आहे. आरोग्य व पोलीस विभागासाठी संयुक्त प्रमाणित कार्यपद्धती तयार करून पोलीस महासंचालकांसोबत समन्वय बैठक घेण्याची गरज असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

### धाडसाला मिळणार ‘मुख्यमंत्री शौर्य पदका’ची सलामी

विशेष म्हणजे, शौर्य दाखविणाऱ्या पोलिसाचा मृत्यू झाल्यास हे पदक मरणोत्तरही देण्याची तरतूद करण्यात आली आहे. दरवर्षी महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच ३० एप्रिलला मुख्यमंत्री शौर्य पदकांची घोषणा केली जाणार आहे. या पदकांची संख्या निश्चित नसेल. राज्यातील विविध भागांतून प्राप्त होणारे कामगिरीचे अहवाल आणि प्रस्ताव यांच्या आधारे पदकांची संख्या ठरविण्यात येईल. गडचिरोली आणि गोंदिया यांसारख्या माओवादप्रभावित जिल्ह्यांसह राज्यातील संवेदनशील भागांत पोलीस अधिकारी व कर्मचारी सातत्याने जीव धोयात घालून कर्तव्य बजावत असतात. अंतर्गत सुरक्षा, माओवादविरोधी कारवाई, दहशतवाद, जातीय दंगली, संघटित गुन्हेगारी आणि तस्करीविरोधातील कारवायांमध्ये पोलिसांच्या धाडसाची अनेक उदाहरणे आहेत. त्यांच्या या कामगिरीला राज्यस्तरीय सन्मानाचे व्यासपीठ मिळणार आहे. निवड प्रक्रियाही निश्चित मुख्यमंत्री शौर्य पदकासाठी पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली प्रथम निवड समिती राहणार आहे. जिल्हास्तरावरून पोलीस अधीक्षक विशेष पोलीस महानिरीक्षकांमार्फत, तर पोलीस आयुक्त पोलीस महासंचालकांकडे प्रस्ताव सादर करतील. त्यानंतर गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून प्रस्तावांची छाननी होऊन ते गृहमंत्री तथा मुख्यमंत्री यांच्याकडे अंतिम मंजुरीसाठी सादर केले जातील. केंद्र सरकारकडून २६ जानेवारी आणि १५ ऑगस्टला पोलीस दलातील शौर्यवान अधिकारी-कर्मचाऱ्यांना विविध शौर्य पदकांनी सन्मानित केले जाते. पश्चिम बंगाल, तमिळनाडू, तेलंगणा, मेघालय, मणिपूर आणि केरळसह काही राज्यांतही पोलीस दलाच्या उत्कृष्ट कामगिरीचा स्वतंत्र पुरस्कारांद्वारे गौरव केला जातो. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात सुरू होणारे ‘मुख्यमंत्री शौर्य पदक’ पोलिसांच्या धाडसाला राज्यस्तरीय मानाची पावती ठरणार आहे.

# बोरावके महाविद्यालयाला ‘आदर्श स्वायत्त महाविद्यालय’ पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर प्रतिनिधी :** रयत शिक्षण संस्थेच्या १०७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विशेष समारंभात श्रीरामपूर येथील रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालयाला ‘डॉ. पतंगराव कदम आदर्श स्वायत्त महाविद्यालय पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासकीय कार्यक्षमता, संशोधन व नवोपक्रम, कौशल्याधिष्ठित शिक्षण, विद्यार्थी-केंद्रित उपक्रम आणि सामाजिक बांधिलकी या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाविद्यालयाला हा सन्मान देण्यात आला. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या कुलाधिकारी तथा खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी विचारवंत, लेखक तथा लोकमतचे संपादक संजय आवटे, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, संघटक डॉ. अनिल पाटील, कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, सचिव किशोर राजे निंबाळकर, सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

स्वायत्त महाविद्यालय म्हणून मिळालेल्या शैक्षणिक स्वातंत्र्याचा प्रभावी वापर करत बोरावके महाविद्यालयाने अभ्यासक्रमातील नावीन्य, संशोधन, नवोपक्रम, कौशल्याधिष्ठित शिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रम तसेच सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. उद्योगाभिमुख शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमुळे महाविद्यालयाच्या वाटचालीला नवी दिशा मिळाली आहे. यावेळी संजय आवटे यांनी रयत शिक्षण संस्थेच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करत, रयतचा शिक्षक असणे हीच मोठी गोष्ट आहे. विद्यार्थ्यांनी केवळ यशस्वी नव्हे, तर आनंदी आणि जबाबदार माणूस बनले पाहिजे, असे सांगितले.

महाविद्यालयाच्या विकासात मीनाताई जगधने यांचे मोलाचे योगदान असून, पुरस्काराबद्दल त्यांच्यासह प्राचार्य प्रो. डॉ. प्रवीण बडधे, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. हा पुरस्कार महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण व समाजाभिमुख वाटचालीला मिळालेली मानाची पावती ठरली आहे.

# मुकिंदपूरच्या उपसरपंचपदी विजय कांबळे यांची निवड




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** :तालुक्यातील ग्रामपंचायत मुकिंदपूर ग्रामपंचायत येथे उपसरपंचपदासाठी निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी ग्रामपंचायतीच्या विद्यमान उपसरपंच सुनिता भिमराज उपळकर यांनी आपल्या उपसरपंच पदाचा स्वेच्छेने राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी निवड प्रक्रिया घेण्यात आली.उपसरपंचपदी विजय दत्तात्रय कांबळे यांची निवड करण्यात आली. ग्रामपंचायतीच्या सरपंच कल्पना सतिष निपुंगे यांच्या अध्यक्षतेखाली निवडणुक प्रक्रिया घेण्यात आली सभेचे सचिव म्हणुन ग्रामपंचायत अधिकारी संतोष खंडागळे यांनी कामकाज पाहिले. सदर निवड प्रसंगी भारती करडक, मंजना खंडागळे, सुनिता निपुंगे, प्रताप हांडे, वर्षा केदारे, दत्तात्रय शिरसाठ, विजय दत्तात्रय कांबळे, नंदा निपुंगे, अमोल घुले, मंदाबाई इंगळे, कानिफनाथ कराडे व दिपक डमाळे हे ग्रामपंचायत सदस्य, सदस्या उपस्थित होते.

# विद्यार्थिनीचा विनयभंग, शिपायाला सात वर्षे सश्रम कारावास,

## ऐतिहासिक ५० दिवसांत निकाल



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** शहरातील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील १२ वर्षीय विद्यार्थिनीच्या विनयभंगप्रकरणी शाळेतील शिपाई विजय मगन पारखे (४६, रा. वाहेगाव) याला गंगापूर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने सात वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. न्यायालयाने आरोपीला ३२ हजार रुपये दंड ठोठावला असून, त्यापैकी २५ हजार रुपये पीडित विद्यार्थिनीला नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाचा निकाल अवघ्या ५० दिवसांत लागला. सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाने १३ साक्षीदार तपासले. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश राहुल शिंदे यांनी ५ ऑक्टोबर रोजी निकाल दिला.

एप्रिल ते जुलै २०२६ या कालावधीत आरोपीने विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याची तक्रार होती. भीतीपोटी विद्यार्थिनी काही काळ गप्प राहिली. त्यानंतर तिने वर्गमैत्रिणीला याबाबत माहिती दिली. दोघींनी मुख्याध्यापिकेकडे घटना सांगितल्यानंतर मुख्याध्यापिकेने तत्काळ पोलिसांत तक्रार दाखल केली.

गंगापूर पोलिसांनी पोक्सो कायद्यासह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. या प्रकरणाचा तपास एपीआय विनायक पाटील यांनी केला. सरकारी पक्षातर्फे ॲड. कृष्णा गंडे यांनी न्यायालयात बाजू मांडली. कोर्ट पैरवी अंमलदार ए. के. शेख यांनी न्यायालयीन कामकाजात सहकार्य केले.

शाळांच्या सुरक्षेबाबत निर्देश या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने गंगापूर तालुक्यातील सरकारी, अनुदानित आणि खासगी शाळांमध्ये शाळा सुरक्षा व सुरक्षितता मार्गदर्शक सूचना तसेच पोक्सो नियमांचे पालन होते की नाही, याची तपासणी करण्याचे निर्देश शिक्षण विभागाला दिले आहेत.

## निधनवार्ता

### ज्येष्ठ कारभारी हनुमंत वायसे



**निघोज :** म्हसे (ता. शिरूर) येथील विकास सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष तथा विद्यमान संचालक हनुमंत भागूजी वायसे (वय ७३) यांचे दीर्घ आजाराने नुकतेच निधन झाले. हनुमंत वायसे यांनी म्हसे येथील विकास सोसायटीच्या उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावली होती. संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी सोसायटीच्या विकासासाठी योगदान दिले. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे पुणे जिल्हा सदस्य तथा घोड-कुकडी कालवा सल्लागार समितीचे माजी सदस्य प्रकाश वायसे यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात दोन मुले,मुली, सुना, नातवंडे, बहिणी असा मोठा परिवार आहे.

### गोरक्षनाथ धसाळ



**राहुरी** : तालुक्यातील वाघाचा आखाडा येथील डॉ. बाबुराव बापुजी तनपुरे सहकारी साखर कारखान्याचे सेवानिवृत्त कर्मचारी गोरक्षनाथ गंगाधर धसाळ (वय ६८) यांचे नुकतेच दुखद निधन झाले असून त्यांच्या पश्चात पत्नी २ मुले १ मुलगी असा परिवार आहे.

### पंढरीनाथ जूंधारे



**राहुरी** : तालुक्यातील मांजरी येथील पंढरीनाथ तुकाराम जुंधारे यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते व राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य नानाभाऊ जुंधारे यांचे वडील होत.

# मोठी स्वप्ने पाहा, मेहनतीने ती साकार करा : डॉ. मनालीताई कोल्हे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव:** विद्यार्थ्यांचे खरे मार्गदर्शक शिक्षक आणि आई-वडील असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्यांचे मार्गदर्शन आणि अनुभवाचे बोल मनापासून ऐकले पाहिजेत. मोठी स्वप्ने पाहा आणि ती साकार करून आई-वडिलांसह शाळेचेही नाव मोठे करा. आजचे युग हे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाचे आहे. त्यामुळे बदल स्वीकारण्याची आणि नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची क्षमता विद्यार्थ्यांनी विकसित केली पाहिजे. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी बदलांशी जुळवून घेणे महत्त्वाचे आहे. यशस्वी होण्यासाठी कोणताही शॉर्टकट नसतो, त्यामुळे मेहनतीला पर्याय नाही, असे प्रतिपादन संजीवनीच्या संचालिका डॉ. मनालीताई कोल्हे यांनी केले. संजीवनी युनिव्हर्सिटी आणि संजीवनी वुमन एम्पॉवरमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री नितीनदादा कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला तब्बल १४५१ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी बक्षिस वितरण प्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना डॉ. मनालीताई कोल्हे बोलत होत्या. व्यासपीठावर वुमन एम्पॉवरमेंट सेलच्या अध्यक्षा डॉ. सोनाली चिने, उपाध्यक्षा डॉ. अश्विनी जमदाडे, डीन डॉ. सरिता पवार, विभागप्रमुख डॉ. माधुरी जावळे, डॉ. मोहिनी गुंजाळ, प्रा . वृंदा कोऱ्हाळकर , डॉ. शाहीन पठाण आदी उपस्थित होते. इयत्ता ७ वी ते ८ वी या गटासाठी ‘निसर्ग वाचवा, भविष्य वाचवा’, ‘माझी शाळा, माझा अभिमान’, ‘पाणी आहे तर जीवन आहे’, ‘स्वच्छ सुंदर भारत’, ‘विज्ञान आणि माझे भविष्य’, ‘प्लास्टिकमुक्त भारत’ आणि ‘संजीवनी’ हे विषय देण्यात आले होते. तर इयत्ता ९ वी ते १२ वी या गटासाठी ‘भारत २०४७: माझ्या स्वप्नातील भारत’, ‘कृत्रिम बुद्धिमत्ताः मानवाचा मित्र की भविष्याचे आव्हान?’, ‘युवा शक्ती-राष्ट्राची शक्ती’, ‘मानवता आणि तंत्रज्ञान’, ‘डिजिटल युगातील विद्यार्थी’, ‘सायबर सुरक्षितता- सुरक्षित डिजिटल भविष्य’ आणि ‘संजीवनी’ हे विषय होते.

# सुवर्णपदक विजेता असलम इनामदारशी हितगुजाने विद्यार्थी भारावले




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** माऊली प्रतिष्ठान संचलित प्राईड अकॅडमी प्री स्कूल टाकळीभान येथे माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे व अकॅडमीच्या संचालिका माजी सभापती डॉ. वंदनाताई मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राईड प्री स्कूल सुरू असून या स्कूलमध्ये आशियाई कबड्डी स्पर्धेत सुवर्णपदक विजेता टाकळीभानचा भूमिपुत्र भारतीय कबड्डी संघाचा स्टार खेळाडू असलम इनामदार याने प्राईड प्री स्कूल टाकळीभान येथे निमंत्रण स्वीकारून भेट दिली व येथील विद्यार्थ्यांशी हितगुज साधले असलम इनामदार याच्या उपस्थितीने चिमुकले विद्यार्थी भारावून गेले. व या उत्कृष्ट राष्ट्रीय कबड्डी खेळाडू समवेत हितगुज करण्याची संधी मिळाल्याने त्यामुळे सर्व विद्यार्थी उत्साहित व प्रफुल्लित झाले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी कबड्डी मॅच खेळा डरे असलम इनामदार यांचे स्वागत केले व चिमुकल्या विद्यार्थ्यांचे कबड्डी खेळाविषयी असणाऱ्या आकर्षण व आवडीचे असलम याने कौतुक केले. याप्रसंगी अशीयाई कबड्डी स्पर्धेत सुवर्णपदक विजेता असलम इनामदार याचा प्राईड अकॅडमी फ्री स्कूल टाकळीभान यांच्यावतीने प्राईड अकॅडमीच्या संचालिका माजी सभापती डॉ. वंदनाताई मुरकुटे व सर्व शिक्षक स्टाफच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला. असलमने सातासमुद्रापार जाऊन आशियाई कबड्डी स्पर्धेत भारत देशाचा विजयाचा झेंडा फडकविल्याने व या टाकळीभान मातृभूमीचे नाव जगात उज्वल केल्याने त्याचे भरभरून अभिनंदन व कौतुक करण्यात आले. याप्रसंगी पत्रकार अर्जुन राऊत, क्रीडा प्रशिक्षक राहुल कोकणे, प्राचार्य जयश्री वाडेकर, शिक्षका ज्योती मिरीकर, निकिता शिरसाठ आदीसह शिक्षक स्टाफ व विद्यार्थी उपस्थित होते

CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME RADHIKA SHARADRAO MOHOD (BEFORE NAME) TO NEW NAME AS RADHIKA MOHOD & SHARAD MADHUSUDAN MOHOD (FATHER NAME ) ( AADHAAR NO.- 577152560857) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE : SHRIRAMPUR DATE : 06/10/2026

## पान १ वरुन

### बॅरिकेड्सवर चढत तिरंगा फडकावला

ज्ञानेश कुमार घाबरले आहेत. जर लोकप्रतिनिधींना निवडणूक आयुक्त भेटणार नसतील तर देशात लोकशाही उरली कुठे? या सर्व प्रकारात सहभागी असलेल्या एकाही व्यक्तीला सोडले जाणार नाही, सर्वांवर देशद्रोहाची कारवाई होईल, असा थेट इशाराच राहुल गांधींनी दिला. संसद भवनापासून निघणारा हा मोर्चा निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे जात असताना पोलिसांनी बॅरिकेडिंग करून इंडिया आघाडीच्या ३०० हून अधिक खासदारांना रोखले. पोलिसांनी राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांना ताब्यात घेऊन बसमध्ये बसवले. मात्र, बसमधून उतरून दोन्ही भावा-बहिणीने गनिमी काव्याने थेट जवळच असलेल्या आकाशवाणी भवनाच्या परिसरात प्रवेश केला.आकाशवाणी भवनातील एका झाडाखाली प्रियंका गांधी यांच्यासोबत बसून राहुल गांधींनी दोन तासांपेक्षा जास्त वेळ ठिय्या आंदोलन केले. निवडणूक आयोगाचे कार्यालय अवघ्या २७० मीटर अंतरावर असताना प्रतिनिधींना भेटू न देणे हा लोकशाहीचा अपमान असल्याची टीका त्यांनी केली.

### वडार समाजाला गौण खनिज उत्खननाची मर्यादा दोनशेवरून ५०० ब्रास

करण्यात आले आहेत. या नियमानुसार वडार समाजातील पिढीजात हाताने दगडफोडीचा व्यवसाय करीत असलेल्या कुटुंबास त्यांच्या व्यवसायासाठी कोणत्याही खाजगी जमिनीतून किंवा आकारणी न केलेल्या सरकारी पडीक जमिनीतून वर्षाला दोनशे ब्रास पर्यंत कोणतेही स्वामीत्वधन न आकारता दगड, मातींचे उत्खनन करता येते.
तथापि, अलिकडे दगड उत्खननात, वाहतूक, डिझेल, मजुरी आणि अवजारांचा खर्च वाढला आहे. यामुळे वार्षिक दोनशे ब्रास दगड, माती उत्खननातून मिळणारे निव्वळ उत्पन्न वर्षभराच्या उपजीविकेसाठी तुटपूंजे ठरते. या समाजाचे आर्थिक उत्पन्न वाढावे, समाजातील मुलांना उत्तम शिक्षण, आरोग्य सुविधा आणि पक्क्या घरांची उपलब्धता व्हावी यासाठी या समाजाच्या विविध संघटनांनी उत्खननाची मर्यादा दोनशेवरून पाचशे ब्रास करण्यात यावी, अशी मागणी केली होती. या मागणीनुसार वडार समाज हा पिढ्यानपिढ्या दगडफोडी व उत्खननाच्या व्यवसायात गुंतलेला असल्याने, तसेच त्यांना मोठ्या व्यावसायिक खाणपट्टा धारकांशी स्पर्धा करणे शय होत नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन ही मर्यादा वार्षिक पाचशे ब्रास करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.
यामुळे वडार समाजातील कारागिरांना वर्षाकाठी किमान उत्पादक व्यवसाय मिळणार असून, त्यांच्या वार्षिक उत्पन्नात वाढ होणे अपेक्षित आहे. याचा या समाजातील पारंपरिक दगडफोडी, उत्खनन व्यावसायिकांना दिलासा मिळणार आहे.

# शालेय क्रीडा स्पर्धा : आयोजन नव्हे, गुणवत्तेचा शोध महत्त्वाचा!

देशभरात शालेय क्रीडा स्पर्धांचा हंगाम सुरू झाला आहे. महाराष्ट्रातही विविध खेळांच्या तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरीय स्पर्धांना सुरुवात झाली आहे. या स्पर्धा केवळ औपचारिकता न राहता नियोजनबद्ध, पारदर्शक आणि दर्जेदार पद्धतीने होणे गरजेचे आहे. कारण शालेय क्रीडा स्पर्धा म्हणजे केवळ जिंकणे-हरणे नव्हे, तर भविष्यातील युवा खेळाडूंच्या गुणवत्तेचा शोध घेण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये विविध खेळांच्या स्पर्धा सुरू आहेत. अनेक ठिकाणी उत्कृष्ट आयोजन होत असले तरी काही ठिकाणी पूर्वतयारीचा अभाव जाणवतो. खेळाडू मैदानावर आल्यानंतर मैदानाचे आखणी करणे, जाळी उभारणे किंवा आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी होणारी धावपळ टाळली पाहिजे. खेळाडू येण्यापूर्वी मैदान, साहित्य, वेळापत्रक आणि पंचांची नियुक्ती पूर्ण झालेली असणे ही आयोजकांची मूलभूत जबाबदारी आहे.

यातील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पंचांची नियुक्ती. संबंधित खेळाचे नियम, तंत्र आणि बारकावे माहीत असलेले अनुभवी व पात्र पंचच असणे आवश्यक आहे. एका खेळातील स्पर्धेसाठी दुसऱ्या खेळातील व्यक्तीची पंच म्हणून नियुक्ती झाल्यास चुकीच्या निर्णयांची शक्यता वाढते. त्याचा थेट परिणाम खेळाडू किंवा संघाच्या भवितव्यावर होऊ शकतो. तालुकास्तरावरील विजेता संघ पुढे जिल्हा,



विभाग आणि राज्यस्तरावर जात असल्याने प्रत्येक टप्प्यावर निष्पक्षता अत्यावश्यक आहे.

तालुकाप्रमुख आणि क्रीडा पदाधिकाऱ्यांनीही या बाबीकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. वर्षभर एखादा खेळ जोपासणाऱ्या, खेळाडूंना प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षक किंवा संस्थेला आयोजनाची जबाबदारी दिल्यास स्पर्धेचा दर्जा उंचावू शकतो.

अलीकडे नेवासा येथील सेंट मेरी स्कूलमध्ये झालेल्या तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत दर्जेदार मैदानाची तयारी करण्यात आली होती. ग्रामीण खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेच्या धर्तीवर मैदान उपलब्ध झाल्याने त्यांना गुणवत्ता दाखवण्याची संधी मिळाली. गौतम पब्लिक स्कूलमधील राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेचे नियोजन आणि मैदानाची तयारीही उल्लेखनीय होती. कोपरगाव तालुक्यातील संजीवनी सैनिकी स्कूलमध्ये झालेल्या शालेय फुटबॉल स्पर्धेतही मैदान, नियोजन आणि खेळाडूंना मिळालेले वातावरण कौतुकास्पद होते.

या उदाहरणांतून स्पष्ट होते की ग्रामीण भागात गुणवत्तेची कमतरता नाही; गरज आहे ती गुणवत्ता शोधण्याची आणि योग्य व्यासपीठ देण्याची. मात्र त्यासाठी स्पर्धांना पुरेसा वेळ देणे आवश्यक आहे. घाईगडबडीत आयोजन केल्यास मैदान, पंच, वेळापत्रक आणि खेळाडूंच्या कामगिरीवर परिणाम होतो.

अहिल्यानगर जिल्ह्यातून अनेक खेळाडूंनी राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण केली आहे. भविष्यातही अनेक प्रतिभावान खेळाडू घडू शकतात. त्यासाठी प्रत्येक शाळा, संघ आणि खेळाडूला गुणवत्तेच्या आधारावर निष्पक्ष संधी मिळणे आवश्यक आहे.

आजच्या शालेय मैदानावर खेळणारा विद्यार्थी उद्या राज्याचा किंवा देशाचा प्रतिनिधी होऊ शकतो. त्यामुळे शालेय क्रीडा स्पर्धा ही केवळ स्पर्धा नसून त्याच्या स्वप्नांची पहिली पायरी आहे. स्पर्धा ‘पूर्ण करणे’ नव्हे, तर योग्य खेळाडू शोधणे, त्याला संधी देणे आणि त्याच्या भवितव्याचा विचार करणे हेच खरे उद्दिष्ट असले पाहिजे. दर्जेदार आयोजनातूनच दर्जेदार खेळाडू घडतील आणि आजच्या शालेय मैदानातूनच उद्याचा भारत घडेल!

**` गौरव अरविंद डेंगळे**
**व्हॉलीबॉल प्रशिक्षक**

# राशीनच्या श्री जगदंबा देवी नवरात्रोत्सवासाठी प्रशासन सज्ज!

**ऋषभ परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री जगदंबा देवी राशीन नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने अखेर हालचाली सुरू केल्या आहेत. कर्जत तहसील कार्यालयात तहसीलदार रवी सातवण यांच्या अध्यक्षतेखाली नवरात्रोत्सवाच्या नियोजनाबाबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. मात्र, त्यानंतर मंदिर परिसरात पाहणी करण्यासाठी आलेल्या प्रशासनासमोर ग्रामस्थ व सेवेकऱ्यांनी नवरात्रोत्सवाची बैठक प्रत्यक्ष मंदिरातच घ्या अशी ठाम मागणी करत प्रशासनाच्या नियोजन पद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

बैठकीस तहसीलदार रवी सातवण, श्री जगदंबा देवी पब्लिक ट्रस्टचे अध्यक्ष निळकंठ देशमुख, सचिव सागडे, गटविकास अधिकारी अजिंक्य सूर्यवंशी, पोलीस निरीक्षक हनुमंत गायकवाड, महावितरणचे कनिष्ठ अभियंता शिंदे, तालुका वैद्यकीय अधिकारी व्हरकटे, आरोग्य विस्तार अधिकारी जाधव, मंडलाधिकारी विश्वास राठोड, राशीनचे ग्राम महसूल अधिकारी सुपेकर, ग्रामसेवक रोहिदास कापरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता सुनील सौताडे, विजय नाना मोढळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**बैठकीनंतर प्रशासन थेट मंदिरात; प्रत्यक्ष पाहणी**

कर्जत येथील बैठक संपल्यानंतर तहसीलदार रवी सातवण, गटविकास अधिकारी अजिंक्य सूर्यवंशी, ग्रामसेवक रोहिदास कापरे, पोलीस निरीक्षक



हनुमंत गायकवाड, राशीन पोलीस स्टाफचे चव्हाण व मुळीक यांच्यासह संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी श्री जगदंबा देवी मंदिर परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी दर्शन रांग, वाहन पार्किंग, वाहतूक व्यवस्था, पोलीस बंदोबस्त, गर्दीचे नियोजन, आरोग्य सुविधा, स्वच्छता तसेच भाविकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा यांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. संबंधित विभागांना जागेवरच आवश्यक सूचना देण्यात आल्या.

**उत्सव राशीनमध्ये, मग नियोजन कर्जतला का? – ग्रामस्थांचा सवाल**

प्रशासन मंदिर परिसरात पाहणीसाठी पोहोचताच ग्रामस्थ, भाविक व सेवेकऱ्यांनी प्रशासनासमोर आपली भूमिका स्पष्ट केली. लाखो भाविक राशीनला येतात, उत्सव राशीनमध्ये होतो आणि प्रत्यक्ष अडचणी राशीनमध्ये निर्माण होतात. मग नवरात्रोत्सवाच्या नियोजनाची बैठक केवळ कर्जत येथे घेऊन प्रशासनाला प्रत्यक्ष परिस्थितीचा अंदाज कसा येणार? असा थेट सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला.

यावेळी रामशेठ कानगुडे, माजी ग्रामपंचायत सदस्य, तात्यासाहेब माने, भाजपा भटके व विमुक्त प्रदेश उपाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते मालोजीराजे भिताडे यांच्यासह ग्रामस्थ व सेवेकऱ्यांनी तहसीलदार रवी सातवण यांच्याकडे निवेदनात्मक स्वरूपात मागणी केली.

**बैठक कागदावर नको; मंदिरातच घ्या!**

नवरात्रोत्सवाच्या उपाययोजनांबाबत मंदिर परिसरातच स्वतंत्र बैठक घेऊन ग्रामस्थ, सेवेकरी, भाविक, पोलीस, ग्रामपंचायत व सर्व संबंधित विभागांना एकत्रित चर्चेत सहभागी करून घ्यावे, अशी मागणी करण्यात आली. विशेषतः मालोजीराजे भिताडे यांनी तहसीलदार रवी सातवण यांच्याकडे उद्या सकाळी ११ वाजता श्री जगदंबा देवी मंदिरात नवरात्रोत्सवाच्या नियोजनाची बैठक घेण्याची विनंती केली. तसेच आवश्यक असल्यास सायंकाळी ४ वाजताही बैठक घेऊन प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करावी, अशी मागणी केली.

**अडचणी सांगा; उपाययोजना करू – तहसीलदार रवी सातवण**

ग्रामस्थ व सेवेकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेत तहसीलदार रवी सातवण यांनी नवरात्रोत्सवाच्या काळात येणाऱ्या अडचणी, सूचना व आवश्यक बाबी प्रशासनाच्या निर्दर्शनास आणून देण्याचे आवाहन केले. अडचणी अर्जाद्वारे अथवा तोंडी स्वरूपात कळवाव्यात. संबंधित विभागांशी समन्वय साधून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे तहसीलदारांनी स्पष्ट केले.

# वानरांच्या भितीने विद्यार्थ्यांनी काढला पळ!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** नगर तालुक्यातील जेऊर गावठाण व परिसरातील वाड्या-वस्त्यांमध्ये वानरांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून मंगळवारी (दि.६) शाळा सुटल्यानंतर विद्यार्थ्यांच्या अंगावर वानरांचा कळप धावून गेल्याने काही विद्यार्थ्यांनी दप्तरे टाकून सुरक्षित ठिकाणी पळ काढला. या प्रकारामुळे विद्यार्थ्यांसह पालकांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



जेऊर मुख्य बाजारपेठ, वाघवाडी, तोडमल वस्ती तसेच परिसरातील वाड्या-वस्त्यांमध्ये वानरांचा मोठ्या प्रमाणात वावर आहे. चार ते पाच नागरिकांना वानरांनी चावा घेतल्याच्या घटना घडल्या आहेत. फळ विक्रेते, व्यावसायिक आणि नागरिकांना वानरांच्या उपद्रवाचा त्रास सहन करावा लागत आहे. फळे पळविणे, दुकानांमध्ये घुसणे तसेच नागरिकांच्या मागे धावणे अशा घटना वारंवार घडत आहेत.

वानरांचा बंदोबस्त करण्यासाठी वनपरिक्षेत्राधिकारी अविनाश तेलोरे यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाची टीम मंगळवारी जेऊरमध्ये दाखल झाली. यावेळी शाळा सुटल्यानंतर विद्यार्थ्यांच्या अंगावर वानरांचा कळप धावून गेल्याचे वन विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही पाहिले. यापूर्वी वाघवाडी व जेऊर गावठाण परिसरातून दोन वानरांना जेरबंद करण्यात आले होते. मंगळवारी आणखी एका वानराला जेरबंद करण्यात आल्याने आतापर्यंत तीन वानरांना पकडण्यात वन विभागाला यश आले आहे.

परिसरात अद्यापही मोठ्या संख्येने वानरांचा वावर असल्याने नागरिकांची चिंता कायम आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याने उर्वरित वानरांचाही तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. यावेळी निमल रेस्क्यू संघटनेचे अध्यक्ष हर्षद कटारिया, वनपाल सचिन गायकवाड, वनरक्षक रंजना घोडके, वनकर्मचारी संजय सरोदे उपस्थित होते. तीन वानरे जेरबंद केल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# ताजनापूर लिफ्टच्या लढ्यात वंचित बहुजन आघाडीला यश



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** ताजनापूर लिफ्टचे काम पहिल्या टप्प्यात पूर्ण झाले, परंतु दुसऱ्या टप्प्यातील काम झाल्यापासून अनेक शेतकरी बांधवांना पाणीच मिळाले नाही. तसेच ज्यांना पाणी मिळाले त्यांची पाईपलाईन काही शेतकऱ्यांनी आपल्या शेतातच फोडून आपल्या शेतात निचरा केला.

ज्या ठेकेदाराला हे काम दिले तो वेळेवर उपलब्ध होत नाही. अनेक तक्रारी गरीब व दलित शेतकरी बांधवांनी शेवगाव येथील अधिकारी कुलकर्णी साहेब यांच्याकडे केल्या, परंतु त्यांनी कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही.

त्यामुळे सर्व ताजनापूर लिफ्ट टप्पा क्रमांक २ मधील पीडित शेतकरी बांधव तसेच वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते-पदाधिकारी यांनी मौजे शेवगाव येथील ताजनापूर लिफ्ट कार्यालय येथे प्रा. किसन चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली उपोषण सुरू केले होते.

जोपर्यंत पाईपलाईन फोडणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई होत नाही व फुटलेल्या पाईपलाईनची दुरुस्ती होत नाही, तोपर्यंत उपोषण / आंदोलन चालूच राहणार अशी भूमिका शेवगाव तालुका अध्यक्ष शेख प्यारेलालभाई यांनी घेतली. या अगोदर अनेक निवेदने देऊनही प्रशासनाने दखल घेतली नव्हती.

या लढ्याला अखेर यश आले असून प्रशासनाने दुरुस्तीचे लेखी आश्वासन दिले आहे.

# ज्योत आणण्यासाठी ३० भाविक श्री क्षेत्र माहुरला रवाना

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** श्रीक्षेत्र अमरापुर येथील श्री रेणुका माता देवस्थाना मध्ये शारदिय नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी सुरु आहे. डॉ. प्रशांत भालेराव यांचे मार्गदर्शनाखाली, नगराध्यक्ष सुभाष घोडके व नगराध्यक्षा जनाबाई घोडके, प्रा. जनार्दन लांडे व. डॉ. अरविंद पोटफोडे यांचे हस्ते ज्योतीची विधीवत पूजा व श्री रेणुका मातेची आरती करुन पायी ज्योत आणण्यासाठी जाणाऱ्या भाविकांना मंगळवारी रवाना करण्यात आले.

यावेळी पांडुरंग देवकर, राजेंद्र नांगरे, अश्वलिंग जगनाडे, गणेश गाडे, सचिन जाखडे, गजानन वाघ, राहुल वाघमारे, गणेश बळे, कृष्णा महाराज मुळीक, संभाजी पंडित, देविदास झरेकर, अनिकेत गायकवाड, हृतिक देशपांडे, अमरनाथ साळवे,सुरेश गाडे, गंपू गाडे, महेश कर्डिले, अभिषेक शिंपी, बारकु बच्छाव, गौतम शिंदे, सचिन सांगळे, अंकुश म्हस्के, बाजीराव बुधवंत, ॲड तनपुरे, आदि ३० भाविक पायी ज्योतआणण्यासाठी रवाना झाले आहेत.

# शाळेत मोबाईल न वापरणाऱ्या शिक्षकांचे सी.ई.ओ. भंडारींनी केले कौतुक!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**चिंचोंडी पाटील :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचोंडी पाटील येथील शिक्षकांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या आवाहनानुसार शालेय वेळेत मोबाईलचा वापर करणे बंद केले आहे. त्यांच्या या सकारात्मक प्रतिसादाबद्दल श्री. भंडारी यांनी शाळेतील शिक्षकांना अभिनंदनाचे पत्र पाठविले आहे.

> आमच्या शाळेचा पट ३३० आहे. १६ शिक्षक आहेत. ग्रामस्थांची नेहमी मदत असते. त्यामुळे आमची शाळा कायम प्रगतिपथावर आहे. सी.ई.ओ. साहेबांनी केलेल्या आवाहनानुसार आमच्या शाळेतील सर्व शिक्षक सकाळी १०.०० ते सायं. ४.०० या कालावधीत त्यांचे मोबाईल मुख्याध्यापक या नात्याने माझ्याकडे जमा करतात. ४.०० वाजता इंटरक्टिव्ह बोर्डवर अध्यापन करण्यासाठी मोबाईल परत दिले जातात. प्रशासकीय कामासाठी माझा मोबाईल नंबर कायम सुरू असतो. मोबाईल बंद केल्याने विद्यार्थ्यांवर त्याचा सकारात्मक परिणाम झाल्याचे आम्हाला जाणवले आहे. हा उपक्रम आम्ही कायमस्वरूपी सुरू ठेवणार आहोत.
>
> **पंढरीनाथ पंडित**



भंडारी हे चिंचोंडी पाटील शाळेच्या संगणक प्रयोगशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमात उपस्थित राहिले होते. त्यावेळी त्यांनी विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थ यांच्याशी हितगुज साधले. विद्यार्थी व शिक्षकांनी मोबाईलपासून दूर होऊन वाचनाकडे वळावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली होती. शाळेच्या वेळेतही अनेक शिक्षकांचे मोबाईल अविरत सुरू असल्याच्या तक्रारी आमच्याकडे प्राप्त झाल्या आहेत. तसेच शाळेबाहेरही अनेक शिक्षक मोबाईलवर व्यस्त असल्याचा अनुभव आला आहे.

या पार्श्वभूमीवर शिक्षकांनी शालेय वेळेत मोबाईल बंद केल्यास त्याचा गुणवत्ता, मनः शांती व वाचन संस्कृती वाढीवर अनुकूल परिणाम होईल, असे आवाहन त्यांनी यावेळी केले होते.

त्यांच्या या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देऊन चिंचोंडी पाटील शाळेतील सर्व शिक्षकांनी शालेय वेळेत मोबाईल वापरणे बंद केले आहे. या प्रतिसादाबद्दल भंडारी यांनी मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांचे पत्र पाठवून विशेष अभिनंदन केले आहे व पत्रामध्ये शाळेचे कौतुकही केले आहे. या शाळेचे अनुकरण जिल्ह्यातील सर्व शाळांनी करावे, अशी अपेक्षाही श्री. भंडारी यांनी व्यक्त केली आहे.

# जामखेडला अतिक्रमणावर प्रशासनाचा हातोडा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**जामखेड :** जामखेड शहरातील वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या हद्दीत करण्यात आलेल्या अतिक्रमणांविरोधात अखेर प्रशासनाने धडक कारवाई सुरू केली आहे. मंगळवारी सकाळी १० वाजता बीड रोडवरील शासकीय दूध डेअरी परिसरापासून या अतिक्रमण हटाव मोहिमेचा करण्यात आला. राष्ट्रीय महामार्गाच्या गटारापासून दोन्ही बाजूंना सुमारे तीन मीटर अर्थात १० फूट अंतरातील अतिक्रमणे हटविण्याची कारवाई करण्यात येत असून, शहरातील तात्पुरत्या तसेच कायमस्वरूपी स्वरूपाच्या अतिक्रमणांवर टप्प्याटप्प्याने हातोडा चालवला जाणार असल्याची माहिती प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दिली आहे.

या मोहिमेसाठी महसूल प्रशासन, जामखेड नगरपरिषद, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि पोलीस प्रशासन संयुक्तपणे मैदानात उतरले आहे. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, घटनास्थळी तहसीलदार शितल सावळे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय साळवे, पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी आपल्या ताफ्यासह उपस्थित राहून संपूर्ण कारवाईवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

जामखेड शहरातील अतिक्रमणाचा प्रश्न गेल्या काही वर्षांपासून अत्यंत गंभीर बनला होता. रस्त्याच्या कडेला उभारण्यात आलेल्या टपऱ्या, दुकाने व इतर बांधकामांमुळे मुख्य रस्त्यांवर सतत वाहतूक कोंडी होत होती. तसेच या अतिक्रमणांमुळे महामार्गाच्या कामावरही विपरीत परिणाम होऊन रस्ता पूर्णत्वास जाण्यास मोठा विलंब होत होता. अखेर गेल्या तीन वर्षांपासून रखडलेल्या या मोहिमेला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. दरम्यान, प्रशासनाने ही कारवाई केवळ एका भागापुरती मर्यादित न ठेवता संपूर्ण शहरातील अतिक्रमणांवर कारवाई करण्याची तयारी केली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत शहरातील विविध भागांमधील अतिक्रमणे हटवली जाणार आहेत. शहरात सुरू झालेल्या या कारवाईचे सर्वसामान्य नागरिकांकडून स्वागत केले जात असले, तरी प्रशासनाने कोणत्याही दबावाला बळी न पडता सर्व अतिक्रमणांवर समान निकषाने आणि नियमानुसार निष्पक्ष कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी पाच रुपयांत शिवभोजन सुरू करा : केकान

**अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** ग्रामीण भागामध्ये टंचाईसाठी प्रति व्यक्ती ५० लिटर पाणी व जनावरांसाठी प्रति जनावर किमान १०० लिटर पाणी मिळावे. टँकरच्या खेपा वाढवाव्यात. टँकर पुरवठ्याचे वेळापत्रक जारी करावे. गाव पातळीवरील पाणी वाटप समित्यांची पुनर्रचना करावी. आदी मागण्यांसाठी तालुक्यातील अकोले गावच्या ग्रामस्थांनी स्थानिक प्रशासनासह जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.



पंचायत समितीचे माजी सदस्य सुभाष केकान यांनी शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. यामध्ये गोविंद गर्जे वसंत गर्जे, गणेश गर्जे, प्रशांत गोसावी, आनंद गोसावी, शहादेव गर्जे, आदींसह विविध कार्यकर्ते सहभागी झाले.

गटविकास अधिकारी राजेंद्र धस यांना निवेदन देताना केकान म्हणाले, राज्य शासनाने हागणदारी मुक्ती योजना गाव पातळीवर अत्यंत प्रभावीपणे राबविली. आता ग्रामीण भागामध्ये उघड्यावर शौचास जाण्यासाठी जागा सुद्धा शिल्लक राहिलेल्या नाहीत. सर्वांना शौचालयाचा वापर करणे अपरिहार्य आहे. यासाठी किमान एका व्यक्तीला एका वेळी किमान दहा लिटर पाण्याची गरज आहे. शौचालयात टाकण्यासाठी पाणी नाही, उघड्यावर जायला जागा शिल्लक राहिलेल्या नाही, अशी अवघड परिस्थिती ग्रामस्थांची झाली आहे. ग्रामीण निकषाप्रमाणे माणशी वीस लिटर पाणी दिले जाते. प्रत्यक्षात एवढ्याशा पाण्या त काहीही भागत नाही. ग्रामीण भागाचेही जीवनमान उंचावल्याने पाण्याची गरज मूलभूत बनली आहे. दुभती जनावरे मोठ्या प्रमाणात असल्याने गाई म्हशींना पिण्यासाठी व देखभालीसाठी दररोज किमान १०० लिटर पाणी लागते. जनावरांना पुरेसे पाणी न मिळाल्यास दुधाचे उत्पादन घटेल. अकोले येथील सर्व वाड्या वस्त्यांसह टँकरने नियमित पाणीपुरवठ्याचा विशेष कृती आराखडा तातडीने तयार व्हावा. कोणत्या क्रमांकाचा टँकर कोणत्या वस्तीवर, किती वाजता, खेपा करणार आहे, असे स्पष्ट नमूद असावे. दैनंदिन वेळापत्रक ग्रामपंचायत कार्यालयात दर्शनी भागी लावण्यात यावे. प्रत्येक टँकर सोबत ग्रामपंचायतीचा एक कर्मचारी नेमावा. कर्मचारी नसल्यास रोजगार हमी योजनेतून त्याची नियुक्ती करावी. . तालुक्यात बहुतेक ठिकाणी गाव पातळीवर टँकरच्या पाण्याचे समान वाटप करण्यात मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. बहुसंख्या ग्रामपंचायतींवर प्रशासक असून माजी पदाधिकारी अजूनही सत्तेवर असल्यासारखे टँकरच्या कामात हस्तक्षेप करतात. त्यामुळे गाव पातळीवर स्थानिक वातावरण सुद्धा दूषित होत चालले आहे. रोजगार हमीची कामे सुरू करण्याबरोबरच जनावरांसाठी तालुक्यात तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात. उसाचे दर अचानक वाढल्याने व चाऱ्यासाठी उसा शिवाय दुसरा पर्याय नसल्याने महागडा चारा विकत घेऊन जनावर जगवणे शेतकऱ्यांच्या आवाक्या बाहेर आहे. छावण्यांमध्ये राहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी पाच रुपये दराने शिव भोजन केंद्र सुरू करावे. शेतकऱ्यांच्या घरात धान्य नाही, बाजारातून वस्तू विकत आणायला हातात पैसा नाही, त्यामुळे शासनाने तातडीने मदत करण्याची आवश्यकता असल्याचे केकान यांनी गटविकास अधिकाऱ्यांच्या निर्दर्शनास आणले.

यावेळी गटविकास अधिकारी राजेंद्र धस यांनी विषय अकराच्या निकषाप्रमाणे शासनाकडून पाणी वाटपाचे निकष ठरवण्यात आले आहेत. त्यामध्ये वाढीव लोकसंख्येचा विचार करण्यात येऊन प्रत्यक्ष सर्वेक्षणात जेवढी लोकसंख्या दिसते त्यानुसारच पाणी वाटप केले जाते. गळक्या टँकर बाबत संबंधित टँकर चालकाला व मालकाला दुरुस्तीबाबत आदेश देण्यात आले आहेत. अकोले ग्रामस्थांच्या मागणीचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठवण्यात येईल असे सांगितले.

## द•ख•ल

### मुंबई क्वीन्स नेकलेस युवा अध्यक्षपदी ॲड. साहिल समीर बोरा



**अहिल्यानगर :** ॲड. साहिल समीर बोरा यांची जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) मुंबई क्वीन्स नेकलेस युवा शाखेच्या अध्यक्षपदी २०२६-२०२८ या कार्यकाळासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. अधिवक्ता, आयपीओ सल्लागार तसेच भारतीय जनता युवा मोर्चा, दक्षिण मुंबईचे सचिव म्हणून कार्यरत असलेल्या ॲड. बोरा यांच्यावर सोपविण्यात आलेल्या या जबाबदारीमुळे अहिल्यानगरच्या सामाजिक व युवा क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे. ॲड. साहिल बोरा हे अहिल्यानगरचे रहिवासी असून, त्यांचे वडील समीर बोरा हे देखील सामाजिक क्षेत्रात सक्रिय आहेत. ते जैन ओसवाल पतसंस्थेचे विद्यमान संचालक तसेच जैन ओसवाल युवक संघाचे माजी अध्यक्ष आहेत. वडिलांच्या सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेत ॲड. साहिल बोरा यांनी कायदा, व्यवसाय, सामाजिक आणि युवा क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे.

### जिल्ह्यात महिलाराज : विविध पदांवर महिला पदाधिकाऱ्यांची नियुक्ती



**अहिल्यानगर :** पुणे येथे दिनांक ३ व ४ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या विश्वमांगल्य सभा,पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या वार्षिक बैठकीत अहिल्यानगर जिल्ह्यातील नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये सौ. रजनी मनोज भंडारी यांची विश्वमांगल्य सभेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. महिला सक्षमीकरण, सामाजिक जागृती, संस्कार आणि समाजोपयोगी उपक्रमांना चालना देण्याच्या उद्देशाने संघटनेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यात संघटनेचे कार्य अधिक व्यापक आणि प्रभावी करण्याची जबाबदारी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. यावेळी अहिल्यानगर जिल्हा संपर्क प्रमुख स्वाती शिरसुल, जिल्हा सहसंपर्क प्रमुख सौ.स्वाती पवळे, जिल्हा सदाचार सभा संयोजिका शिल्पा भदाणे, तर रूपाली मोहिते यांची जिल्हा बालसभा संयोजिका म्हणून नियुक्ती करण्यात आली. रजनी भंडारी व नूतन पदाधिकार्यांचे सौ धनश्री विखे सह अनेकांनी अभिनंदन केले आहे

### चारा छावण्यांऐवजी शेतकऱ्यांच्या खात्यात थेट 'डीबीटी' द्वारे अनुदान द्या



**शिराळ :** अहिल्यानगर जिल्ह्यात निर्माण झालेल्या अत्यंत गंभीर दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे पशुधन संकटात सापडले आहे. अशा परिस्थितीत शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून पारंपारिक चारा छावण्या सुरू करण्याऐवजी, थेट लाभ हस्तांतरण योजनेद्वारे शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर प्रति जनावर दैनंदिन अनुदान जमा करावे, या मागणीचे निवेदन 'शिव श्री क्रांती शेतकरी संघटने च्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, चालू वर्षी पावसाअभावी हिरवा व सुका चारा पूर्णपणे संपला आहे. बाजारात चाऱ्याचे दर गगनाला भिडल्याने अल्पभूधारक व सर्वसामान्य शेतकऱ्यांना आपली जनावरे सांभाळणे अशक्य झाले आहे. परिणामी, शेतकरी अत्यंत तुटपुंज्या आणि कवडीमोल भावाने आपली जनावरे विकण्यास मजबूर झाले आहेत.

### कर्जतमध्ये चोरी; लाखोंचा ऐवज लंपास

**कर्जत :** शिक्षक दाम्पत्य शाळेत गेल्याचे पाहून चोरट्यानी घरात प्रवेश करून घरातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम घेत पोबारा केला. दिवसा-ढवळ्या झालेल्या जबरी चोरीने शहरात खळबळ उडाली. विशेष म्हणजे प्रवेशद्वार न उघडता चोरट्यानी संरक्षक भिंतीवरून घरात प्रवेश केल्याचे समजते. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवार, दि ६ रोजी कर्जत शहरातील स्वामीसमर्थ उपनगरातील अनिल खंडागळे शिक्षक दाम्पत्य नेहमीप्रमाणे सकाळी शाळेसाठी रवाना झाले. घर बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्यानी प्रवेशद्वारातून प्रवेश न करता संरक्षक भिंतीवरून उडी मारत प्रवेश केला असल्याची प्राथमिक माहिती मिळते. आणि घराचे कुलूप तोडून घरात कोणीच नसल्याचे पाहत तब्बल ८ ते ९ तोळे सोने आणि रोख रक्कम असा लाखोंचा ऐवज घेत पोबारा केला. दुपारच्या सुट्टीत घरी आले असता कपाटाची उचका-पाचक आणि अस्ताव्यस्त पडलेल्या सामानावरून चोरी झाल्याचे खंडागळे यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ कर्जत पोलिसांना सदरच्या घटनेबाबत माहिती दिली. पोलिसांनी पंचनामा करीत तपास सुरू केला. मात्र दिवसा घडलेल्या चोरीच्या प्रकरणाने शहरात चांगलीच खळबळ उडाली. रात्री उशिरापर्यंत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

### जुन्या वादातून युवकावर धारदार वस्तूने वार भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा




**अहिल्यानगर :** भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुन्या तक्रारीचा राग मनात धरून एका युवकाला मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. ख्रिश्चन कब्रस्थानाजवळ, बुऱ्हाणनगर रोड परिसरात हा प्रकार घडला. फिर्यादी काशिफ असिफ सय्यद हे सायंकाळी आपल्या दुचाकीवरून जात असताना ही घटना घडली. पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, आरोपी अली इरफान सय्यद आणि इरफान सय्यद यांनी फिर्यादीला गाठले. त्यांच्यात पूर्वी दिलेल्या तक्रारीवरून वाद सुरू होता. याच गोष्टीचा राग मनात धरून आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ केली. तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करत त्यांच्यावर काहीतरी धारदार वस्तूने वार केले. या हल्ल्यामध्ये फिर्यादी जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## दखल

### पुणे विभाग शिक्षक मतदार संघाकरिता निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती

**पुणे :** भारत निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी निवडणूक निरीक्षक म्हणून डॉ. हनमनलू तुम्मोड यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती शीतल तेली- उगले यांनी दिली आहे.

श्री. तुम्मोड यांचा निवासाचा पत्ता 'शिवनेरी', व्हीव्हीआयपी सर्कीट हाऊस, बंडगार्डन पुणे असा असून त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ८२०८३८७७६९ असा आहे. निवडणूक निरीक्षक यांना व्हीव्हीआयपी सर्कीट हाऊस येथे सकाळी सकाळी ११ ते दुपारी १२ वा. या कालावधीत भेटता येईल. तसेच नमूद भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल. निवडणूक निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी अनिल बडे हे असून त्यांचा संपर्क क्र. ९२८४०५८४११ असा आहे, असेही निवडणूक प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

### 'सेवा माझे योगदान'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे :** जिल्हा परिषदेतर्फे 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या 'सेवा माझे योगदान' उपक्रमाला जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे. १७ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर तसेच १ ते १५ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, कंपोस्टिंग, योग, ध्यान यांसह विविध लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात येत आहेत.३० सप्टेंबरअखेर जिल्ह्यातील १३ तालुक्यांत २४ हजार ७२४ नागरिकांनी सहभाग नोंदविला असून, ९ हजार ९५६ लाभार्थींना विविध उपक्रमांचा लाभ मिळाला आहे.

हवेली तालुक्यात सर्वाधिक २ हजार ५३६ नागरिक सहभागी झाले असून, १ हजार १४ लाभार्थींना लाभ मिळाला. शिरूरमध्ये २ हजार ३३० नागरिक व ९३२ लाभार्थी, खेडमध्ये २ हजार २५२ नागरिक व ९०९ लाभार्थी, तर जुन्नरमध्ये २ हजार २३० नागरिक व ८९२ लाभार्थी सहभागी झाले.इंदापूरमध्ये २ हजार १७८ नागरिक व ८७९ लाभार्थी, मावळमध्ये २ हजार ९२ नागरिक व ८३७ लाभार्थी, मुळशीत २ हजार ९ नागरिक व ८०९ लाभार्थी, तर पुरंदरमध्ये २ हजार ७० नागरिक व ८२८ लाभार्थींना लाभ मिळाला.भोरमध्ये १ हजार ६४६ नागरिक व ६४८ लाभार्थी, दौंडमध्ये १ हजार ५४४ नागरिक व ६३४ लाभार्थी, बारामतीमध्ये १ हजार ४९३ नागरिक व ५९७ लाभार्थी, आंबेगावमध्ये १ हजार ३३४ नागरिक व ५४९ लाभार्थी, तर राजगडमध्ये १ हजार १० नागरिक व ४२८ लाभार्थी सहभागी झाले.अभियानाच्या माध्यमातून स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन, आरोग्य आणि सामाजिक सहभागाबाबत जनजागृती करण्यात येत आहे. आगामी काळातही विविध लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात येणार असून, नागरिकांनी अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन पुणे जिल्हा परिषद प्रशासनाने केले आहे.

### कुरकुंभ एमआयडीसीत आपत्कालीन सराव

**दौंड :** कुरकुंभ औद्योगिक वसाहतीत संभाव्य औद्योगिक आपत्कालीन परिस्थितीचा संयुक्त सराव नुकताच घेण्यात आला. औद्योगिक आस्थापना, शासकीय यंत्रणा, पोलीस, अग्निशमन दल, वैद्यकीय पथक आणि स्थानिक प्रशासनातील समन्वय, तत्परता व आपत्कालीन प्रतिसादाची कार्यक्षमता तपासणे हा सरावाचा उद्देश होता.

सहसंचालक सुधीर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या सरावात अमोनिया वायूची वाहतूक करणाऱ्या टँकरमधून गळती होऊन गुडलक चौक परिसरात आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्याचे काल्पनिक दृश्य तयार करण्यात आले. त्यानुसार बचावकार्य, प्रथमोपचार, जखमींचे स्थलांतर, अग्निशमन, वाहतूक नियंत्रण, परिसर सुरक्षित करणे आणि नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्याचा प्रत्यक्ष सराव करण्यात आला.या सरावात क्लीन फिनो केम, अल्काइल अमाइन्स, सिप्ला, एटर्निस, एमक्युअर, ऑनर लॅब, कारगिल, हेनकेल, हार्मनी ऑरगॅनिक्स यांसह कुरकुंभ औद्योगिक क्षेत्रातील विविध आस्थापनांनी सहभाग घेतला.

व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य विभागाचे उपसंचालक अंकुश खराडे, प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्रतिनिधी विठ्ठल बनोटे, व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य विभागाचे अधिकारी प्रवीण पाटील, विष्णू सांगोलकर, महेंद्र सावंत, विनोद मदुरकर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता विजय पेटकर, दौंड पोलिस प्रशासनाचे सहायक पोलिस निरीक्षक गवळी यांच्यासह अग्निशमन दल, वैद्यकीय पथक व औद्योगिक आस्थापनांचे प्रतिनिधी सहभागी झाले.

### दौंड तालुक्यात 'सेवा संकल्प अभियान' यशस्वी

**दौंड :** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातर्फे बोरीऐंदी येथे 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत शेतकरी महिला प्रमाणपत्र अर्ज नोंदणी, पीएम-किसान अडचणी निवारण कॅम्प तसेच विविध शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी विशेष शिबिर घेण्यात आले. या वेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांच्या हस्ते शेतकरी महिलांना 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' वितरित करण्यात आले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम २०२६' अंतर्गत शेतकरी महिलांना कायदेशीर ओळख व अधिकार मिळवून देण्याची गरज असल्याचे सांगितले. शेतकुटुंबातील महिलांच्या योगदानाला अधिकृत मान्यता मिळण्यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्र महत्त्वाचे असून, शासनाच्या विविध योजनांमध्ये महिलांचा सहभाग वाढविणे हा अभियानाचा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संदिप गायकवाड होते. गावपातळीवर अशा उपक्रमांमुळे शेतकरी आणि विशेषतः महिलांना योजनांचा लाभ घेणे सुलभ होत असल्याचे त्यांनी सांगितले.

### ओबीसी महामंडळामार्फत एकरकमी परतफेड योजना लागू

पुणे : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात संपूर्ण थकीत कर्ज रकमेचा एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यांना थकीत व्याजात ५० टक्के सूट देण्याबाबत एकरकमी परतफेड योजना ३१ मार्च २०२७ पर्यंत लागू करण्यात आली आहे. थकबाकीदार लाभार्थीनी या योजनेचा फायदा घेऊन कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक श्रीमती आर.एन. माने यांनी केले आहे

# फळपीक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना आंबिया बहार सन २०२६- २७ करिता द्राक्ष, मोसंबी, केळी, पपई, नारळ, संत्रा, अंजीर, आंबा व डाळिंब या पिकांसाठी सहभागी होण्यासाठी https://www.pmfby.gov.in या राष्ट्रीय पीक विमा पोर्टलवर विहित मुदतीत अर्ज करावेत, असे आवाहन विभागीय कृषि सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांनी केले आहे.

**योजनेत सहभागी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी अर्थात फार्मर आयडी, डिजिटल पीक सर्वेक्षण अंतर्गत फळपिकांची नोंद, आधार कार्ड, बँक खाते तपशील, जमीन धारणेचा ७-१२ उतारा, फळबागेचा जिओ टॅगिंग फोटो, भाडेपट्ट्याने शेती करणाऱ्यास नोंदणीकृत भाडेकरार आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा अथवा https://krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असेही कळविण्यात आले आहे.**

ही योजना पुणे, सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यात भारतीय कृषि विमा कंपनी लि. मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी द्राक्ष पिकासाठी १५ ऑक्टोबर, केळी, मोसंबी, पपई, नारळ पिकासाठी ३१ ऑक्टोबर, संत्रा, अंजीर पिकासाठी ३० नोव्हेंबर, आंबा पिकासाठी ३१ डिसेंबर २०२६ व डाळिंब पिकासाठी १४ जानेवारी २०२७ याप्रमाणे अंतिम मुदत राहील. ही योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक आहे. या योजनेत गारपीट या हवामान धोक्यासाठीचा सहभाग ऐच्छिक असून त्यासाठी अतिरिक्त विमा हप्ता आहे. कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होणार आहेत किंवा नाही याबाबत घोषणापत्र अंतिम मुदतीच्या सात दिवस अगोदर भरुन देणे आवश्यक राहील. योजनेत सहभाग नोंदवण्यासाठी अधिसूचित फळबागांचे प्रती शेतकरी कमीत कमी २० गुंठे व सर्व फळपिकांचे मिळून जास्तीत जास्त ४ हेक्टर इतके उत्पादनक्षम क्षेत्र मर्यादा आहे. एका फळपिकासाठी एका वर्षात एकाच क्षेत्रावर मृग अथवा आंबिया बहारापैकी एकाच हंगाम करिता विमा संरक्षणासाठी अर्ज करता येईल. बोगस किंवा फसवणूक करून विमा योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास अशा अर्जदारास पुढील किमान ५ वर्षे विमा योजनेचा लाभ मिळणार नाही अशी कार्यवाही कृषि विभागामार्फत करण्यात येईल.

## वन्यजीव संवर्धनासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**डिंभे :** वन्यजीव हे पर्यावरणातील अन्नसाखळीचा महत्त्वपूर्ण घटक असून, त्यांच्या संवर्धनासाठी युवकांनी पुढाकार घेऊन वनसंवर्धनाचा ध्यास घ्यावा, असे आवाहन वन्यजीव अभ्यासक नवनाथ फलके यांनी केले.

वन्यजीव सप्ताहानिमित्त आसाणे ता. आंबेगाव येथील शाळेत जुन्नर वनपरिक्षेत्र व घोडेगाव वनपरिक्षेत्र यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना वन्यजीवांचे महत्त्व, अधिवास, वन्यजीव संरक्षण आणि मानव-वन्यजीव सहजीवन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.वन्यजीव अभ्यासक नवनाथ फलके यांनी सांगितले की, १९५२ पासून वन्यजीव सप्ताह साजरा केला जात आहे. नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन आणि त्याबाबत जनजागृती करणे हा या सप्ताहाचा उद्देश आहे. शहरीकरण, उद्योग, रस्ते, धरणे आणि मोठ्या प्रमाणातील वृक्षतोडीमुळे वन्यजीव व पक्ष्यांचा अधिवास धोक्यात आला आहे.

नैसर्गिक संसाधनांचा अविचारी उपसा, अतिक्रमण आणि शिकारीमुळेही वन्यजीवांपुढे आव्हान निर्माण झाले आहे. वन्यजीवांचे संवर्धन न झाल्यास पर्यावरणाचा समतोल बिघडण्याची शक्यता आहे. त्यामुळे संरक्षणासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

**जंगलाशेजारी मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष सध्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. यातून मध्यम मार्ग काढून मानवासोबतच वन्यजीवांचेही रक्षण करणे आवश्यक आहे. वन्यजीव पर्यावरणातील अन्नसाखळी पूर्ण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.**

**-कुणाल लिमकर, वनपरिक्षेत्र अधिकारी, घोडेगाव वनपरिक्षेत्र**

**वन्यजीवांचे संरक्षण म्हणजे आपल्या स्वतःच्या भविष्याचे आणि निसर्गाचे संरक्षण आहे. वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने आपण सर्वांनी निसर्गाचा समतोल राखण्याची आणि वन्यजीवांना त्रास न देण्याची प्रतिज्ञा घेतली पाहिजे.**

**- आरोही गवारी, विद्यार्थिनी**




कार्यक्रमास वनपरिक्षेत्र अधिकारी, घोडेगाव वनपरिक्षेत्र कुणाल लिमकर, वनपाल गुलाब विथापे, वनरक्षक संदीप लांडे, वनरक्षक सागर मुकणे, वनरक्षक वीरेंद्र लंकेश्वर, रेस्क्यू टीम सदस्य पिलाजी वाळकोळी, पवन आसवले, विलास भालेराव तसेच शाळेचे मुख्याध्यापक आंधळे, शिक्षक साखरे, लोहकरे, ठोकळ, निंबाळकर आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## बळीराजावरील अस्मानी संकट दूर होऊ दे

### माऊलींच्या चरणी मंत्री भरतशेठ गोगावले यांची आर्त साद

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** महाराष्ट्रातील बळीराजावर आलेले अस्मानी संकट लवकर दूर होऊन राज्य पुन्हा धनधान्याने सुजलाम्-सुफलाम् व्हावे, अशी प्रार्थना राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन खार भमी मंत्री भरतशेठ गोगावले यांनी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या चरणी केली.



पुणे दौऱ्यावर असताना मंत्री गोगावले यांनी श्री क्षेत्र आळंदी येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. माऊलींच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर मनाला अथांग शांतता आणि आत्मिक समाधान लाभल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, विश्वस्त चैतन्य महाराज लोढे, व्यवस्थापक ज्ञानेश्वर (माऊली) वीर, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रकाश वाडेकर, शहरप्रमुख राहूल चव्हाण देवस्थानचे पदाधिकारी, मानकरी आणि सहकारी उपस्थित होते.सद्गुरु स्वामी गणेशनाथ महाराज यांच्या समाधी सोहळ्यानिमित्त आळंदीत गोगावले यांच्या कॅबिनेट मंत्रीपदी निवडीबद्दल नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले. दरम्यान, मंत्री गोगावले यांनी ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांची शैक्षणिक वाटचाल, शिक्षणातील विविध आव्हाने तसेच अन्य विषयांवर त्यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा केली.

## घराघरात सौरऊर्जेचा प्रकाश

### शिरूरमध्ये सूर्यघर, स्मार्ट सोलर योजनेची जनजागृती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** वाढत्या वीजखर्चाला पर्याय देतानाच स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी प्रधानमंत्री सूर्यघर वीज योजना आणि स्वयंपूर्ण महाराष्ट्र रूफटॉप स्मार्ट सोलर योजनेबाबत शिरूर पंचायत समितीच्या वतीने जनजागृती करण्यात आली.




पंचायत समिती परिसरात माहिती किऑस्क उभारून नागरिकांना रूफटॉप सोलरचे फायदे, उपलब्ध शासकीय अनुदान, पात्रता, अर्ज प्रक्रिया तसेच घराच्या छतावर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक प्रक्रियेची माहिती देण्यात आली. स्वयंपूर्ण महाराष्ट्र रूफटॉप स्मार्ट सोलर योजनेच्या जनजागृतीसाठी १५ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विशेष अभियान राबविण्यात येत आहे.

घराच्या छतावर सौरऊर्जा प्रकल्प उभारल्याने पारंपरिक विजेवरील अवलंबित्व कमी होण्यास, वीजबिलात संभाव्य बचत होण्यास तसेच स्वच्छ ऊर्जेच्या वापरातून पर्यावरण संवर्धनास मदत होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन रूफटॉप सोलर बसविण्याचा विचार करावा, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी शिरूर पंचायत समिती सभापती स्वाती घावटे, गटविकास अधिकारी महेश ढोके, महावितरण बारामती मंडळ अधीक्षक अभियंता दीपक लहामगे, शिरूर उपविभाग उपकार्यकारी अभियंता शरद माने, शिक्रापूर उपविभाग उपकार्यकारी अभियंता सुमित जाधव, नोडल अधिकारी गणेश गोरे, संदेश पगारिया, थोरात तसेच महावितरणचे अधिकारी-कर्मचारी आणि वीज ग्राहक उपस्थित होते.

महावितरणच्या माध्यमातून सौरऊर्जेपासून होणारी संभाव्य बचत, रूफटॉप सोलरची कार्यपद्धती, शासकीय अनुदान आणि अर्ज प्रक्रियेबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

## ज्येष्ठांच्या आरोग्यासाठी धामारीत तपासणी शिबिर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आयुष्मान आरोग्यवर्धिनी आयुष व उपकेंद्र, धामारी यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. धामारी व परिसरातील ज्येष्ठ नागरिकांनी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शिबिरात हिमोग्लोबिन, रक्तदाब, मधुमेह तसेच प्राथमिक आरोग्य तपासणी करण्यात आली. वाढत्या वयात उद्भवणाऱ्या आजारांचे वेळीच निदान व्हावे आणि आवश्यक उपचार व मार्गदर्शन मिळावे, हा शिबिराचा उद्देश होता.

आयुष्मान आरोग्यवर्धिनी धामारीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. भाऊसाहेब वाघमोडे यांनी उच्च रक्तदाब, मधुमेह, कोलेस्टेरॉल, हृदयविकार, हाडांची झीज, सांधेदुखी, दृष्टी व श्रवण समस्या तसेच मानसिक आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. छातीत दुखणे, अचानक घाम येणे, श्वास घेण्यास त्रास होणे, शरीराच्या एका बाजूला कमजोरी येणे किंवा बोलण्यात अचानक अडचण निर्माण होणे अशी गंभीर लक्षणे दिसल्यास तातडीने वैद्यकीय मदत घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

ज्येष्ठांनी कमी मीठ, साखर व तेलाचा वापर असलेला संतुलित आहार घ्यावा. फळे, भाज्या, कडधान्ये व तंतुमय पदार्थांचा आहारात समावेश करावा. क्षमतेनुसार नियमित चालणे, हलका व्यायाम, योग व प्राणायाम करावा, तसेच डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधांमध्ये बदल करू नये, असा सल्ला देण्यात आला.

नियमित आरोग्य तपासणी, रक्तदाब व मधुमेह नियंत्रण, संतुलित आहार, पुरेसे पाणी, व्यायाम, योग्य औषधोपचार, घरातील सुरक्षितता, डोळे-कान-दात व हाडांची काळजी, मानसिक आनंद आणि गंभीर लक्षणे दिसताच वैद्यकीय सल्ला, असा दहा सूत्री आरोग्य मंत्र ज्येष्ठांना देण्यात आला.

शिबिरासाठी समुदाय आरोग्य अधिकारी सारिका राठोड, औषध निर्माण अधिकारी संदीप खैरे, योग प्रशिक्षक अंकुश घारे, आरोग्य सेवक निलेश शेंडे, आरोग्य सेविका आशा हिंगे, आशा सेविका तसेच माजी आरोग्य सहाय्यक शिवाजीराव पावशे यांनी सहकार्य केले.

यावेळी सरपंच सीमाताई शेळके, माजी सरपंच संपतराव कापरे, माजी ग्रामपंचायत सदस्य माधवराव पठारकर, ज्येष्ठ नागरिक सतीशराव गायकवाड, माजी मुख्याध्यापक श्रीधर गायकवाड, तुकाराम शेळके यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. योग प्रशिक्षक अंकुश घारे यांनी आभार मानले.

# शिक्रापुरात महिलेसाठी आपदा मित्र व पोलीस ठरले देवदूत

- रात्रीच्या अंधारात विहिरीत पडलेल्या महिलेला मिळाले जीवदान
- पोलीस कर्मचाऱ्याने भर अंधारात घेतली थेट विहिरीत उडी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरूर) येथील चाकण रोड लगत रात्री दोन वाजण्याच्या सुमारास विहिरीत पडलेल्या महिलेसाठी शिक्रापूर पोलीस स्टेशनचे दोन पोलीस व चार आपदा मित्र देवदूत ठरले असून पोलीस व आपदा मित्रांच्या प्रयत्नाने विहिरीत पडलेल्या महिलेला जीवदान मिळाले आहे.

शिक्रापूर (ता. शिरूर) येथील चाकण रोड लगत असलेल्या अथर्वनगर येथे काही युवक रात्री दोन वाजण्याच्या सुमारास नवरात्रोत्सव साठी मंडपचे काम करत असताना शेजारील विहिरीत काहीतरी पडल्याचा आवाज आल्याने युवकांनी विहिरीत पाहिले असताना एक महिला पाण्यामध्ये पडल्याचे दिसून आले, युवकांनी याबाबतची माहिती आपदा मित्र व पोलिसांना मिळताच पोलीस हवलदार विश्वांबर वाघमारे, शरद धूरपते, आपदा टीमचे अध्यक्ष राहुल गायकवाड, शेरखान शेख, महेश साबळे पाटील, गणेश टिळेकर यांनी सदर ठिकाणी धाव घेतली, यावेळी पोलीस शिपाई शरद धूरपते यांनी थेट विहिरीमध्ये उडी घेतली तर पोलीस हवलदार विश्वांबर वाघमारे व आपदा टीमचे शेरखान शेख यांनी विहिरीत उतरुन अमोल नप्ते, राधेशाम चव्हाण, गणेश तौर, शुभम सपकाळे, सिद्धेश डफळ, रवी जगताप, अनिकेत चकोर, सुमित भोगाडे, पवन माळी यांसह आदी नागरिकांच्या मदतीने महिलेला पाण्यातून बाहेर काढले, दरम्यान सदर महिलेला उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून विहिरीत पडलेल्या महिलेसाठी देवदूत ठरलेल्या शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या दोन पोलीस व चार आपदा मित्रांच्या कार्याचे परिसरातून कौतुक होत आहे.

**शिक्रापूर येथे विहिरीत पडलेली महिला उपचार घेत असलेल्या माऊलीनाथ मल्टीस्पेशालीस्ट हॉस्पिटलचे संचालक डॉ. पवन सोनवणे यांच्याशी संपर्क साधला असता महिलेची प्रकृती स्थिर असून महिलेच्या पायाला इजा झालेली आहे मात्र रात्री फक्त दहा मिनिटे लवकर महिला रुग्णालयात आल्याने महिला बचावली असल्याचे त्यांनी सांगितले.**




**शिक्रापूर (ता. शिरुर) येथे महिलेसाठी देवदूत ठरलेले पोलीस व आपदा मित्र.(छायाचित्र आकाश भोरडे)**

# मागील वर्षीच्या महापुरात नुकसान मदत एक वर्षानंतरही मिळेना ?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगाव :** मागील वर्षी सप्टेबर २०२५ मध्ये शेवगाव तालुक्यात अनेक नद्यांना महापूर येऊन नदीकाठच्या अनेक कुटुंबाचे महापुरामुळे मोठे नुकसान झाले. मात्र एक वर्ष उलटून गेले तरी तालुक्यातील अनेक कुटुंबे प्रशासनाच्या दिरंगाईमुळे मदतीपासून वंचित राहिली आहेत.

सप्टेबर २०२५ मध्ये शेवगाव तालुक्यामध्ये अनेक ठिकाणी ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. त्यामुळे तालुक्यातील अनेक नद्या, ओढे, यांना महापूर आला. या महापुरामुळे नदीकाठच्या नागरिकांच्या घरात पाणी शिरले अनेकांचे संसार उपयोगी साहित्य, धान्य, छोटे मोठे पाळीव प्राणी वाहून गेले, सततच्या जोरदार पावसामुळे भिंती खचून घरे पडली, अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी खचून बुजून गेल्या. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ. मोनिका राजळे, तहसीलदार आकाश दहाडदे यांनी सर्वत्र फिरून परिस्थिती पाहून तातडीने नुकसानीचे पंचनामे करून पीडित कुटुंबांना तातडीने मदत देण्याचे आदेश दिले गेले. मात्र तालुक्यातील नुकसानग्रस्त ५०० कुटुंबा पैकी २०० कुटुंबांना घर पडझडीची प्रत्येकी सहा हजार रुपये प्रमाणे तुटपुंजी मदत मार्च महिन्यात वितरित केल्याचे सांगण्यात आले. मात्र उर्वरित ३२० कुटुंबांना अद्याप छदामही मिळाला नाही. घरात पाणी शिरलेले ११०० प्रस्ताव आहेत मात्र. महसूल प्रशासनाच्या नोंदीनुसार तलाठी यांनी सादर केलेले २३० प्रस्तावच परिपूर्ण आहेत त्यांना तर प्रति कुटुंब ४००० रुपयेच मदत मिळणार आहे. त्यांनाच मदत मिळेल मग उर्वरित ८०० कुटुंबांचे काय ? अनेक शेतकऱ्यांच्या विहिरींचे खचून मोठे नुकसान झाले. मात्र तालुक्यातील पूर्व भागातील ढोरजळगाव परिसरातील शेतकऱ्यांना अद्यापही मदत मिळाली नाही. अनेक नागरिक हे शेवगाव तहसीलला चकरा मारून कंटाळले मात्र तेथील कर्मचारी यांच्यावर कुणाचा वचक न राहिल्याने ते प्रस्ताव अजूनही धुळखात पडून आहेत.आ. मोनिका राजळे यांनी जातीने लक्ष घालून नुकसानग्रस्तांना तातडीने मदत मिळवून देण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

> महापुरामुळे झालेल्या नुकसानीची मदत दोन टप्प्यात दिली गेली आहे. उर्वरित नागरिकांना मदत मिळावी यासाठी निधीची मागणी केली गेली आहे. निधी मिळताच रक्कम अदा केली जाईल.
>
> **आकाश दहाडदे**
> **तहसीलदार**



## विहिरीत पडलेल्या दोन कोल्ह्यांसह सायाळाला जीवदान!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** बेलवंडी, लिंपणगाव आणि पाचपुतेवाडी (काष्टी) परिसरातील विहिरीत पडलेल्या दोन कोल्ह्यांसह एका सायाळाचा जीव वनविभागाच्या तत्परतेमुळे वाचला. वन्यप्राणी विहिरीत पडल्याची माहिती मिळताच श्रीगोंदा वनविभागाच्या पथकाने विलंब न करता घटनास्थळी धाव घेत रेस्क्यू मोहीम राबविली.

अथक प्रयत्नांनंतर तिन्ही वन्यप्राण्यांना सुरक्षितपणे विहिरीबाहेर काढण्यात आले. प्राथमिक तपासणीनंतर त्यांना नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

वन्यप्राण्यांचा जीव वाचविण्यासाठी वनविभागाच्या पथकाने दाखविलेल्या तत्परतेचे परिसरातून कौतुक होत आहे.

विहिरींना संरक्षक जाळी अथवा कठडे करावेत आणि वन्यप्राणी अडकल्यास तातडीने वनविभागाला माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## द•ख•ल




### शिवनेरी वितरीकास्तरीय पाणी वापर संस्था महासंघ अध्यक्षपदी डेरे

**निघोज :** शिवनेरी वितरीकास्तरीय पाणी वापर संस्था महासंघ अध्यक्षपदी निघोज येथील प्रगतिशील शेतकरी शिवाजीराव डेरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. महासंघाच्या कार्याध्यक्ष, कार्यकारी संचालक पदावर विश्वनाथ येवले, उपाध्यक्षपदी रमाशेठ निचीत, अमोल कातोरे यांची निवड करण्यात आली आहे. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष सुभाष झिंजाड होते. संचालकपदी दिलीपराव मदगे, धोंडिभाऊ भोर, संतोषराव मोरे, पांडुरंग ढवळे, अरुणशेठ तांबोळी यांची निवड करण्यात आली आहे. साधारण पारनेर तालुक्यातील डावा कालवा तसेच कुकडी नदीच्या माध्यमातून जवळपास साडे सतरा हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येईल अशी परिस्थिती आहे. मात्र पारनेर तालुक्यातील बहुसंख्य शेतकरी पाणी अर्ज घेत नाहीत म्हणून फक्त तीन साडेतीन हजार हेक्टर क्षेत्र प्रत्यक्षात ओलीताखाली येत असते. हा महासंघ यासाठी विशेष करुन सर्वाधिक क्षेत्र ओलिताखाली येण्यासाठी प्रयत्नशील आहे. या नूतन पदाधिकारी व संचालक मंडळाचे जुन्नर, पारनेर तालुक्यातील शेतकरी व पाणी वापर संस्था पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी अभिनंदन केले आहे.

### प्रशांत लोखंडे यांचा अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातून उमेदवारी अर्ज



**अहिल्यानगर :** शिवसेना मुख्यनेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार मा.खा. सदाशिव लोखंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशांत सदाशिव लोखंडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. यावेळी शिवसेना आ.अमोल खताळ, आ. विठ्ठलराव लंघे पाटील,जिल्हाप्रमुख रावसाहेब खेवरे, बाबुशेठ टायरवाले, डॉ अजित वाळे पाटील ,उपजिल्हाप्रमुख रमेश काळे,दादासाहेब कोकणे,कैलास भणगे,संजय वाकचौरे,भगवानराव गंगावणे,यांच्यासह शिवसेना पक्षाचे शेकडो पदाधिकारी उपस्थित होते.

### मॅरेथॉन स्पर्धेतील विजेत्यांचा डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते गौरव



**पारनेर :** राळेगण सिद्धी ते पिंपळनेर मार्गावर आयोजित कन्हैय्या मॅरेथॉन स्पर्धेतील विजेत्या धावपटूंचे बक्षीस वितरण माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कन्हैय्या सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित या स्पर्धेला धावपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध गटांमध्ये झालेल्या स्पर्धेत सहभागी धावपटूंनी उत्साहाने धाव घेतली. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी अण्णासाहेब हजारे, गिंताजली शेळके, मच्छिंद्र लंके, सुरेश पठारे, राहुल शिंदे, गणेश शेळके, प्रशांत गायकवाड, अशोक सावंत, विजय औटी, श्रीकांत पठारे, युवराज पठारे, पंकज कारखिले, दिनेश बाबर, सचिन शेळके, राजेंद्र शेळके, नितीन अडसूळ, अभय औटी, विठ्ठल पवार, लहू भालेकर, उत्तम भालेकर, प्रितेश पानमंद उपस्थित होते. यावेळी डॉ. सुजय विखे पाटील यांनी युवकांनी आरोग्य आणि तंदुरुस्तीला प्राधान्य देत अशा उपक्रमांत सहभागी व्हावे,असे आवाहन केले.

### तुळजाभवानी मातेच्या पलंगाचे शुक्रवारी नगरला आगमन

**अहिल्यानगर :** नगरमधील सबजेल चौकातील पलंगे कुटुंब मानकरी असलेल्या व सुमारे ८०० वर्षाची परंपरा असलेल्या श्री तुळजाभवानी मातेच्या पलंगाचे आगमन नगर शहरात बोल्हेगाव,केडगाव, निबळक मार्गे भूतकरवाडीतील ताठे मळ्यात शुक्रवार दि ९ ऑक्टोबरला नगरला आगमन होणार आहे अशी माहिती पलंगाचे मानकरी गणेश पलंगे यांनी दिली आहे. पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथून पलंग निघाल्यावर सध्या पारनेर तालुक्यात आहे.

## न्यू आर्ट्स कॉलेजच्या स्वयंसेवकांकडून पारनेरमध्ये विशेष स्वच्छता मोहीम

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**पारनेर :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला आणि क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अण्ड सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वच्छता हीच सेवा या उपक्रमांतर्गत विशेष स्वच्छता मोहीम अत्यंत उत्साहात राबविण्यात आली. प्रत्यक्ष कृतीतून स्वच्छतेचा आणि सामाजिक समतेचा विचार समाजात रुजवत महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांनी या मोहिमेत हिरिरीने भाग घेतला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांच्या संकल्पनेतून या विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा फुले यांनी आपल्या कार्यातून दिलेला सामाजिक परिवर्तनाचा संदेश आणि महात्मा गांधी यांनी स्वच्छतेला दिलेले अढळ स्थान यांची सांगड घालत, तरुण पिढीमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना दृढ करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या स्वच्छता मोहिमेत केवळ विद्यार्थीच नव्हे, तर महाविद्यालयाचे प्राध्यापकही प्रत्यक्ष झाडू हाती घेऊन स्वच्छतेत सहभागी झाले होते. यात महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. दिलीप ठुबे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. हरेश शेळके, डॉ. हनुमंत गायकवाड, प्रा. सविता पिंगट, प्रा. रोहिणी म्हसे, प्रा. आनंद पाटेकर, प्रा. दीपक खामकर आणि डॉ. प्रवीण जाधव यांच्यासह शेकडो स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त योगदान दिले. कार्यक्रमाचे नेटके नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रकाश गावित, प्रा. नितीन निपुंगे आणि डॉ. माया लहारे यांनी केले. महात्मा फुले यांच्या सामाजिक परिवर्तनाचा विचार आणि गांधीजींचा स्वच्छतेचा मंत्र खऱ्या अर्थाने कृतीत उतरवणारा हा उपक्रम ठरल्याची भावना नागरिकांनी व उपस्थितांनी व्यक्त केली.

## जनावरे चारण्यासाठी गेलेल्या महिलेवर हल्ला ; सोन्याचे दागिने लंपास

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** जनावरे डोंगरात चारण्यासाठी गेलेल्या ५५ वर्षीय महिलेचा पाठलाग करून दोन अनोळखी तरुणांनी तिच्यावर हल्ला करत गळ्यातील सोन्याची पोत आणि कानातील सोन्याची फुले ओरबाडून नेल्याची धक्कादायक घटना जेऊर परिसरातील चापेवाडी-डोंगरगण रस्त्यावर ४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी घडली. या घटनेत महिलेच्या दोन्ही कानांना गंभीर दुखापत झाली असून सुमारे ३५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केले. वस्तीच्या जवळच ही घटना घडल्याने चापेवाडी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आशा विलास पवार (वय ५५, रा. चापेवाडी) यांनी याबाबत एमआयडीसी पोलिसांत फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार आशा पवार या ४ ऑक्टोबर रोजी सकाळी जनावरे घेऊन डोंगरात चारण्यासाठी गेल्या होत्या. सायंकाळी सुमारे ५.४५ वाजता जनावरे घेऊन चापेवाडीकडे परतत असताना चापेवाडी-डोंगरगण रस्त्यावर सदरची घटना घडली. मोटारसायकलवर असलेल्या दोन जणांनी महिलेचा पाठलाग केला. जवळ आल्यानंतर त्यांनी महिलेला खाली पाडून तिच्या अंगावरील दागिने हिसकावण्यास सुरुवात केली. महिलेने कानातील फुले काढून देण्याचा प्रयत्न केला. मात्र चोरट्यांनी तिचे ऐकले नाही. त्यांनी कानातील सोन्याची फुले ओरबाडून घेतल्याने दोन्ही कानांना गंभीर दुखापत झाली. यावेळी महिलेचा गळा व तोंडही आवळण्यात आल्याचे तिने सांगितले.

चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोतही हिसकावून घेतली. चोरीस गेलेल्या ऐवजात अंदाजे १५ हजार रुपये किमतीचे तीन ग्रॅम वजनाचे सोन्याचे दोन फुले तसेच सुमारे २० हजार रुपये किमतीची चार ग्रॅम वजनाची सोन्याची मणी व काळे मणी असलेली पोत असा एकूण ३५ हजार रुपयांचा ऐवज असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

वस्तीपासून जवळच महिलेवर हल्ला करून दागिने लुटल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. या रस्त्यावर पोलिसांची गस्त वाढवावी, तसेच महिलेवर हल्ला करणाऱ्या दोन्ही आरोपींचा तात्काळ शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी चापेवाडी परिसरातील नागरिकांनी केली आहे. या प्रकरणी दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांकडून आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे.

## पर्यावरण संवर्धनातून मानव संवर्धनाचा संदेश




प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहानिमित्त वन्यजीव पोस्टर स्पर्धा, वन्यजीव प्रश्नमंजुषा यांसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची भावना जागृत व्हावी, या उद्देशाने 'मानवी जीवनातील पर्यावरणाचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, जुन्नर येथील माजी सैनिक व वनरक्षक रमेश खरमाळे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, वृक्षसंवर्धन, वन्यजीव संरक्षण आणि सामाजिक बांधिलकी याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रा. राजीव सावंत, डॉ. कुलदीप रामटेके, डॉ. सचिन दातखिळे, डॉ. संतोष घुले, प्रा. नितीन महाले यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. सागर तांबे यांनी केले, तर आभार योगिता शिंदे यांनी मानले.

## बैलपोळ्याच्या बाजारावर दुष्काळाचे सावट!

### पाऊस-पाण्याअभावी शेतकरी हवालदिल, उलाढाल ठप्प

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**राशीन :** शेतकऱ्यांचा पारंपरिक आणि जिव्हाळ्याचा सण असलेल्या बैलपोळ्यावर यंदा दुष्काळाचे सावट स्पष्टपणे दिसून येत आहे. राशीन परिसरात पावसाने पाठ फिरवल्याने शेतीची परिस्थिती गंभीर झाली असून, बैलपोळ्यानिमित्त भरलेल्या बाजारात अपेक्षित गर्दी आणि खरेदी-विक्रीचा उत्साह दिसून येत नाही.

पाऊस नाही, पाणी नाही, पिकांची अवस्था चिंताजनक आणि हातात पैसा नाही, अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. त्यामुळे बैलांना सजविण्यासाठी लागणारे साहित्य, झुली, रंग, शिंगांची सजावट तसेच इतर वस्तूंच्या बाजारपेठेतही ग्राहकांची संख्या कमी झाली आहे.

दरवर्षी बैलपोळ्याच्या काळात राशीन बाजारपेठेत मोठी उलाढाल होत असते. मात्र यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे बाजारपेठेत शुकशुकाट असून व्यापारी आणि व्यावसायिकही चिंतेत आहेत. शेतकऱ्यांच्या खिशात पैसा नसल्याने सणाचा उत्साहही मंदावला असून दुष्काळाने ग्रामीण अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम केला आहे.

एकीकडे पावसाची प्रतीक्षा, दुसरीकडे शेतीवरील खर्च आणि कर्जाचा वाढता बोजा, यामुळे शेतकरी आर्थिक विवंचनेत आहे. त्यामुळे यंदाचा बैलपोळा उत्सव साधेपणाने साजरा करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

पाऊस पडला तर शेती वाचेल, शेती वाचली तर बाजारपेठेला पुन्हा चैतन्य येईल, अशी अपेक्षा शेतकरी आणि व्यापाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

## मुद्दसर शेख यांची अध्यक्षपदी निवड

**अमरापुर :** तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती सेवक वर्ग सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी मुद्दसर शेख यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यापारी वर्गाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. बाजार समितीच्या नुकत्याच पार पडलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पतसंस्थेच्या अध्यक्षपदाची निवड प्रक्रिया उत्साहात पार पडली. निवडीनंतर व्यापारी वर्गाच्या वतीने मुद्दसर शेख यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी राजेंद्र देहाडराय, कैलास देहाडराय, उमर शेख, सुरेश पाटील (पत्रकार), दत्ता मुटकुळे तसेच बाळासाहेब कोरडे, दळे, किशोर मगर, दिपक अभंग, यांच्यासह बाजार समितीतील व्यापारी व मान्यवर उपस्थित होते.

## ४० लाखांच्या निधीतून ग्रामपंचायत कार्यालयाची नवी इमारत




प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** तालुक्यातील शेडगाव ग्रामपंचायतीच्या नवीन कार्यालयीन इमारतीच्या बांधकामाचा श्रीगणेशा ग्रामस्थ, पदाधिकारी व अधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आला. सुमारे ४० लाख रुपये खर्चातून उभारण्यात येणाऱ्या या इमारतीमुळे ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय कामकाजाला अधिक सक्षम व आधुनिक स्वरूप मिळणार आहे. नवीन कार्यालयाच्या माध्यमातून ग्रामस्थांना विविध दाखले, शासकीय योजना व ग्रामपंचायतीशी संबंधित कामांसाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत.

त्यामुळे या इमारतीकडे केवळ कार्यालय म्हणून नव्हे, तर गावाच्या प्रशासकीय विकासाचे केंद्र म्हणून पाहिले जात आहे.

भूमिपूजन प्रसंगी लक्ष्मणराव रसाळ, भीमराव बेलेकर, डॉ. जांभळे, शांताराम गोरे, किसन बेलेकर, विजय रसाळ, शाहुराज भोपळे, नानासाहेब शिंदे, शिवराज राजेभोसले, अमोल भोपळे, बिभीषण राऊत, बालाजी भोसले, डॉ. अमोल झेंडे, विलास रणसिंग, धनराज भोपळे, पोपटराव राऊत, डॉ. गिरमे, राजू खुडे, सचिन गोरे यांच्यासह ग्रामविकास अधिकारी शिंदे, प्रशासक, विस्तार अधिकारी मांढरे आदी उपस्थित होते.

## एसआयआर रद्द करा, दुष्काळग्रस्तांना न्याय द्या

### आज खा. लंके यांच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीचा मोर्चा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री





**पारनेर :** मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या प्रक्रियेविरोधात तसेच दुष्काळग्रस्त शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी इंडिया आघाडीच्या वतीने बुधवारी (ता. ७) अहिल्यानगर येथे जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. खा. नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

मोर्चाची सुरुवात बुधवारी सकाळी ११ वाजता जुने आरटीओ कार्यालय येथून होणार आहे. त्यानंतर डीएसपी चौक, अहिल्यानगर महानगरपालिका मार्गे मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर जाणार आहे. या ठिकाणी विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देण्यात येणार आहे. एसआयआर प्रक्रिया रद्द करावी, मतदारांचा मतदानाचा हक्क अबाधित ठेवावा, अशी प्रमुख मागणी मोर्चाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. पात्र मतदारांचे नाव मतदार यादीतून वगळले जाऊ नये, तसेच मतदारांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यात यावे, अशी भूमिका इंडिया आघाडीने मांडली आहे.

जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नांकडेही मोर्चातून लक्ष वेधण्यात येणार आहे. दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकरी आणि मजुरांना शासनाने तातडीने मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात येणार आहे.

या मोर्चात इंडिया आघाडीतील विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी, शेतमजूर तसेच नागरिक सहभागी होणार आहेत. नागरिकांनी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन इंडिया आघाडी, अहिल्यानगर जिल्ह्याच्यावतीने करण्यात आले आहे.

दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३५३ I बुधवार ०७ ऑक्टोबर २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

# दुष्काळाचा दाह वाढला!

## राज्यात आणखी १९ तालुक्यात दुष्काळ जाहीर | रोजगार हमीची कामे वाढवा : फडणवीस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** राज्यात १० टक्के पाणी कपातीची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी तसेच दुष्काळी भागात रोजगार हमी योजनेतील कामे वाढवावीत असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत दिले. दुसरीकडे राज्यात दुष्काळाची व्याप्ती वाढू लागली असून आणखी १९ तालुक्यात दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्याचा निर्णय मंगळवारी दुष्काळ निवारण उपाययोजना मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे राज्यातील दुष्काळी तालुक्यांची संख्या आता ३०२ झाली आहे. दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यातील पंचनामे २० ऑक्टोबर पूर्वी पूर्ण करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले असून बाधित शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत करण्याचे नियोजन करण्याचेही समितीने प्रशासनास दिले.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. यावेळी राज्यातील २६५ तालुक्यातील ३२ हजार ८२३ गावांपैकी १७ हजार ९४१ गावातील ३८ लाख १७ हजार हेक्टर क्षेत्रावरील नुकसानीचे पंचनामे करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. त्याचप्रमाणे आणखी काही तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याची माहिती मंत्रिमंडळास देण्यात आली. त्यावेळी पाण्याचे नियोजन आतापासूनच करा, १० टक्के पाणी कपातीची राज्यभरात काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.

त्यानुसार शहरी व ग्रामीण भागात १० टक्के पाणीकपात लागू करण्यासोबतच, शेतकऱ्यांना कर्जवसुलीसाठी त्रास देणाऱ्या बँकांवर कारवाई करणे, चाऱ्याची टंचाई दूर करणे आणि दिवाळीपूर्वी मदत वाटपाचे नियोजन करण्याबाबत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय दुष्काळ निवारण उपाययोजना मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली संध्याकाळी झालेल्या बैठकीत घेण्यात आले.

जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन



मंत्री पंकजा मुंडे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील तसेच विविध विभागांचे सचिव आणि अधिकारी उपस्थित होते.

राज्यात सध्या ४५ टक्क्यांवर पंचनामे पूर्ण झाले आहेत. उर्वरित पंचनाम्यांचे काम जलद गतीने पूर्ण करुन कोणत्याही परिस्थितीत २० ऑक्टोबर पर्यंत पंचनामे पूर्ण करण्याचे आदेश बैठकीत देण्यात आले. तसेच पंचनाम्यासाठी ५ टक्के निधी वेगळा राखून ठेवण्याचे आदेशही जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

शेतकऱ्यांना कर्जवाटप करताना बँकांकडून होणाऱ्या विलंबाबाबत मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष बावनकुळे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. बँकांच्या अडमुठ्या धोरणावर टीका करताना राज्यात आतापर्यंत केवळ ८ टक्केच पीक कर्जवाटप झाल्याचे सांगताना, बँकांनी शेतकऱ्यांकडे वारंवार कागदपत्रांची मागणी करू नये, एकदा पीक कर्ज घेतले असल्यास पुन्हा कागदपत्रे मागू नयेत, असे आदेश दिले. तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा खाजगी बँकेने अथवा खाजगी फायनान्सरने या काळात शेतकऱ्यांना कर्जभरण्यासाठी फोन करून वेठीस धरू नये. असे प्रकार घडल्यास कडक कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला. याप्रकरणी मुख्य सचिवांच्या स्तरावर तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय बैठका घेऊन प्रश्न सोडवण्याचे आदेश देण्यात आले.

शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी कर्जमाफीतील वारसांच्या नोंदी आणि केवायसी गावनिहाय (पान ४ वर)

### केंद्रीय पथक दोन दिवसात राज्यात

राज्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय समिती दोन दिवसात राज्यात येणार आहे. येत्या १० किंवा १२ तारखेला केंद्रीय समिती पाहणीसाठी राज्यात येणार आहे. ही समिती तीन स्वतंत्र पथकांद्वारे बीड-धाराशिव, यवतमाळ-वाशिम आणि अहिल्यानगर-सोलापूर या जिल्ह्यांचा दौरा करून आढावा घेणार आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले.

### प्रत्येक जिल्ह्याला नवीन १ हजार ट्रान्सफार्मर मंजूर, अखंडित वीजपुरवठा

राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमध्ये बळीराजाला मोठा दिलासा देणारा अभूतपूर्व निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. वितरण रोहित्र, 'स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर' आणि 'कॅपॅसिटर बँक' खरेदी करण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास समिती (डीपीडीसी) अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यासाठी तब्बल २० कोटी रुपयांपर्यंतचा विशेष निधी उपलब्ध करून देण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने मंगळवारी मंजुरी दिली. महावितरणकडून राज्यात सुमारे ४७ लाखांवर कृषी ग्राहकांना विविध क्षमतेच्या वितरण रोहित्रांद्वारे वीजपुरवठा केला जात आहे. दुष्काळी परिस्थितीत हा वीजपुरवठा सुरळीत आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम राहणे आवश्यक असल्याने राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात वीज यंत्रणा सक्षम करण्याचे आदेश दिले आहेत.

### दुष्काळ जाहीर झालेले १९ तालुके

| | |
|---|---|
| नांदेड | : सुरतखेडा, मुखेड, अर्धापूर ३ |
| चंद्रपूर | : चिमूर, ब्रह्मपुरी, बल्लारपूर ३ |
| गोंदिया | : आमगाव, देवरी, सालेकसा, गोंदिया ४ |
| वर्धा | : कारंजा १ |
| भंडारा | : मोहाडी, तुमसर २ |
| नाशिक | : त्र्यंबकेश्वर, चांदवड, निफाड ३ |
| सातारा | : पाटण १ |
| सांगली | : शिराळा, कडेगाव २ |



## बॅरिकेड्सवर चढत तिरंगा फडकावला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी लोकशाहीविरोधात गद्दारी केली आहे, त्यामुळे त्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी आक्रमक मागणी करत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिल्लीत थेट रस्त्यावर उतरून आंदोलन केले. दिल्लीमध्ये इंडिया आघाडीच्या 'सेव्ह डेमॉक्रसी मार्च' दरम्यान राहुल गांधी यांचा आक्रमक अवतार पाहायला मिळाला.

आंदोलनाला रोखण्यासाठी दिल्ली पोलिसांनी लावलेल्या बॅरिकेड्सवर स्वतः चढत राहुल गांधी यांनी हातात तिरंगा फडकावला. या आंदोलनामुळे दिल्लीतील राजकीय वातावरण प्रचंड तापले असून संपूर्ण देश ढवळून निघाला आहे.

**ज्ञानेश कुमारांच्या विरोधात राहुल गांधी आक्रमक**

राहुल गांधी यांनी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर जोरदार निशाणा साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, सरसंघचालक मोहन भागवत आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मिळून देशातील लोकशाही संपवली आहे. देशाच्या निवडणुका मोदी आणि शाह यांनी हायजॅक केल्या असून ज्ञानेश कुमार यांनी त्यांना थेट मदत केली आहे, असा आरोप राहुल गांधींनी केला. (पान ४ वर)

## धाडसाला मिळणार 'मुख्यमंत्री शौर्य पदका'ची सलामी

### साहसी पोलिसांना ५० हजार, पदक व प्रशस्तीपत्र

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** जीवाची पर्वा न करता कर्तव्य बजावताना संकटाशी दोन हात करणाऱ्या महाराष्ट्र पोलिसांच्या शौर्याला आता राज्य सरकारकडून स्वतंत्र सलामी मिळणार आहे. माओवाद, दहशतवाद, संघटित गुन्हेगारी, तस्करी अथवा दंगलीच्या प्रसंगी जोखीम पत्करून उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी राज्य सरकारने 'मुख्यमंत्री शौर्य पदक' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या सन्मानासोबत ५० हजार रुपयांचे रोख पारितोषिक आणि प्रशस्तीपत्रही दिले जाणार आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत या योजनेला मंजुरी देण्यात आली.

पोलीस दलातील अनेक अधिकारी आणि कर्मचारी कर्तव्य बजावताना स्वतःचा जीव धोक्यात घालून नागरिकांचे प्राण आणि मालमत्तेचे रक्षण करतात. अशा धाडसी कामगिरीची दखल घेऊन त्यांचा गौरव करण्यासाठी हे पदक देण्यात येणार आहे. (पान ४ वर)

## महत्वाचे..

### पोलीस कोठडीतील मृत्यू प्रकरणी नुकसानभरपाईच्या धोरणास मान्यता

**मुंबई :** पोलीस कोठडीतील व्यक्तींच्या मृत्यू प्रकरणात त्यांच्या जवळच्या वारसदारांना नुकसानभरपाई देण्याबाबतच्या धोरणास आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या धोरणानुसार पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या मारहाण, अत्याचार किंवा दबावामुळे मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाल्यास जवळच्या वारसदारास ५ लाख रुपये नुकसानभरपाई देण्यात येणार आहे.

अशा व्यक्तिस शारिरीक किंवा मानसिक छळामुळे पन्नास टक्क्यांहून कमी कायमस्वरुपी अपंगत्व आल्याचे निष्पन्न झाल्यास दोन लाख आणि त्याहून अधिक प्रमाणात अपंगत्व आल्याचे निष्पन्न झाल्यास चार लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. कोठडीतून पलायन करताना अपघात होऊन मृत्यू झाल्यास, अवाजवी मागणीसाठी उपोषण किंवा वैद्यकीय उपचार घेण्यास नकार दिल्याने झालेला मृत्यू या परिस्थितीत ही नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

## अवैध गर्भलिंग निदानाविरोधात यंत्रणा अधिक सक्रिय करणार : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** अवैध गर्भलिंग निदान आणि बेकायदेशीर गर्भपात रोखण्यासाठी आरोग्य, पोलीस आणि महसूल विभागांमध्ये समन्वय वाढवून जिल्हास्तरीय यंत्रणा अधिक सक्षम करण्यात येईल. विभागीय आढावा बैठका घेऊन कारवाईला गती देण्यासोबतच कार्यवाहीचा दर आठवड्याला आढावा घेतला जाईल, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.



### संघटित गुन्ह्यांत मोक्काची शिफारस

वारंवार आणि संघटित स्वरूपात अवैध गर्भलिंग निदान व बेकायदेशीर गर्भपात करणाऱ्या डॉक्टरांसह गुन्ह्यात सहभागी व्यक्तींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) लागू करण्याबाबत कृती दलाने शिफारस केली आहे. याबाबत विधी व न्याय विभागाचे मत घेऊन आवश्यक कायदेशीर पर्यायांचा अभ्यास करण्यास आरोग्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका दर्शविल्याचे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले.

मंत्रालयात राज्यस्तरीय कृती दलाच्या पहिल्या बैठकीत ते बोलत होते. कृती दलाच्या अध्यक्ष डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार डॉ. मनीषा कायंदे, उमा खापरे, स्नेहा दुबे तसेच संबंधित अधिकारी बैठकीस उपस्थित होते. नागपूर येथील हिवाळी (पान ४ वर)

## वडार समाजाला गौण खनिज उत्खननाची मर्यादा दोनशेवरून ५०० ब्रास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** पारंपरिक दगडफोडी आणि गौण खनिजाचे उत्खनन करून उपजिवीका करणाऱ्या वडार समाजाला मोठा दिलासा देणारा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयानुसार या समाजासाठी गौण खनिज स्वामित्वधनासाठी (रॉयल्टी) सवलत आता वार्षिक उत्खनन मर्यादा दोनशे ब्रास वरून, पाचशे ब्रास करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या सवलतीसाठी महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे), नियम १९६८ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीचे योग्य पध्दतीने सनियंत्रण करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजाचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ तयार (पान ४ वर)

## बी.आय.आर. कायदा पूर्ववत लागू करा; अन्यथा साखर कारखाने बंद

### साखर कामगारांचा कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा; थकीत वेतन तातडीने देण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** साखर कामगारांच्या हक्कांवर परिणाम करणारा बी.आय.आर. (महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, १९४७) कायदा रद्द करण्याचा निर्णय तातडीने मागे घेऊन तो पूर्ववत लागू करावा, तसेच राज्यातील साखर कामगारांचे सुमारे एक ते दीड हजार कोटी रुपयांचे थकीत वेतन तातडीने अदा करावे, या प्रमुख मागण्यांसाठी राज्यातील साखर कामगारांनी सोमवारी (५ ऑक्टोबर) कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार इशारा मोर्चा काढला. २२ ऑक्टोबरपर्यंत मागण्या मान्य न झाल्यास राज्यातील साखर कारखाने बंद ठेवण्याचा इशारा साखर कामगार संघटनांच्या नेत्यांनी दिला.



महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्या काळे, सरचिटणीस राऊ शंकर पाटील, महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघाचे अध्यक्ष पी. के. मुंडे व सरचिटणीस आनंद वायकर यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला. राज्यभरातून सुमारे २५ ते ३० हजार साखर कामगार मोर्चात सहभागी झाले होते.

बिंदू चौकातून मोर्चाला सुरुवात झाली. दसरा चौक, व्हीनस कॉर्नर, असेंब्ली रोडमार्गे मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. हातात झेंडे, मागण्यांचे फलक घेतलेल्या कामगारांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे परिसर दणाणून गेला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झालेल्या सभेत कामगार नेत्यांनी आंदोलनाची पुढील दिशा स्पष्ट केली.

कारखाना कोणताही असो, प्रश्न एकच; संघटना कोणतीही असो, लढा एकच, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. साखर उद्योगातील कामगारांच्या विविध प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी नेत्यांनी केली. बी.आय.आर. कायदा रद्द करण्याचा निर्णय कामगारांच्या हिताविरोधात असल्याचा आरोप करीत तो तातडीने पूर्ववत लागू करण्याची मागणी करण्यात आली. तसेच विविध साखर साखर(पान ४ वर)

## वैजापूरमध्ये 'भाग्योदय ॲग्रो'वर FDA चा दणका

### २३.३२ लाखांचा खाद्यतेल साठा जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** "Safe Food Safe Maharashtra' मोहिमेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनाने वैजापूर तालुक्यातील गंगापूर रोडवरील घायगाव येथील मे. भाग्योदय ॲग्रो इंडस्ट्रीज या ऑईल रिपॅकिंग युनिटवर धडक कारवाई केली. तपासणीदरम्यान अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन, प्रचंड अस्वच्छता आणि अन्नपदार्थांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर त्रुटी आढळून आल्याने प्रशासनाने या युनिटचा परवाना तात्काळ निलंबित केला. संशयित निकृष्ट व चुकीच्या पद्धतीने लेबल केलेला (Substandard Misbranded) १०,७९८.४ किलो रिफाइंड पामोलिन ऑईलचा तब्बल २३ लाख ३२ हजार ४५५ रुपयांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी प्रज्ञा प्रमोद सुरसे यांच्या



पथकाने २ ऑक्टोबर २०२६ रोजी या संस्थेची अचानक तपासणी केली. अन्न सुरक्षा मानके व ऋडडअखच्या निकषांनुसार करण्यात आलेल्या तपासणीत संस्थेची कामगिरी अत्यंत समाधानकारक नसल्याचे समोर आले. एकूण ८६ गुणांपैकी केवळ ३६ गुण (४२ टक्के) मिळाल्याने संबंधित युनिट 'अपात्र' (Non-Compliance) ठरले.

**फरशी तेलकट, पाणीही संशयाच्या भोवऱ्यात**

तपासणीदरम्यान कारखान्यातील फरशी तेलकट व चिकट झालेली आढळली. अनेक ठिकाणी फरशी तुटलेली होती. उत्पादनासाठी वापरले जाणारे पाणी पिण्यायोग्य असल्याचे सिद्ध करणारे खड:१०५०० मानकानुसार प्रमाणपत्र अथवा चाचणी अहवाल उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले.

अन्नपदार्थ तसेच पॅकिंगसाठी लागणारे साहित्य उघड्यावर आणि थेट जमिनीवर ठेवण्यात आले होते. साठवणुकीसाठी आवश्यक जागाही अपुरी असल्याचे आढळले. याशिवाय तेल साठवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या लोखंडी टाक्यांऐवजी नियमानुसार स्टेनलेस स्टीलच्या टाक्यांचा वापर अपेक्षित असल्याचे तपासणीत स्पष्ट झाले.

**दरवाजे उघडे; कीटक प्रतिबंधक जाळ्यांचाही अभाव**

कारखान्याचे दरवाजे उघडे होते, तर खिडक्यांना कीटक प्रतिबंधक जाळ्या बसविलेल्या नव्हत्या. त्यामुळे धूळ, माशा व इतर कीटक अन्नपदार्थांच्या संपर्कात येण्याचा धोका निर्माण झाला होता. कीटक नियंत्रणासाठी (Pest Control) केवळ दाखला उपलब्ध असला, तरी प्रत्यक्षात प्रभावी कीटक नियंत्रण व्यवस्था आणि त्यासंबंधी आवश्यक अहवाल उपलब्ध नसल्याचेही पथकाच्या निदर्शनास आले.

**कामगारांकडे फक्त टोपी; हातमोजे-ॲप्रनचा अभाव**

अन्नपदार्थ हाताळणाऱ्या कामगारांच्या सुरक्षिततेबाबतही गंभीर त्रुटी (पान ४ वर)

**अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईनंतर भाग्योदय ॲग्रो इंडस्ट्रीजने एका पत्रकाद्वारे आपले स्पष्टीकरण दिले आहे. ही कारवाई आजची नसून सुमारे सात ते आठ दिवसांपूर्वीची असून, ती प्रामुख्याने 'भ्रामक लेबलिंग' आणि काही तांत्रिक बाबींशी संबंधित असल्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे. पामोलीन तेलाचा नमुना तपासणीसाठी पाठवला असून, त्याचा अहवाल अद्याप आलेला नाही. ग्राहकांनी कोणत्याही अफवा किंवा गैरसमजाला बळी पडू नये, असे आवाहन करत संस्थेने आमच्या उत्पादनांची गुणवत्ता आणि ग्राहकांचे समाधान हेच आमचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे म्हटले आहे. प्रयोगशाळेचा अंतिम अहवाल आल्यानंतर सर्व सत्यता पारदर्शकपणे समोर आणली जाईल, अशी ग्वाहीही संस्थेने दिली आहे.**